म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. ९२३८



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401237
BVBK-0401237

# लाखांचा प्राणदाता

विषय : वाचा
दा. क्र. २४३

कुमार कादंबरीकामाला क्र. १०

# एक होती सिंहीण

( कुमारांसाठी कादंबरी )

न. दि. दुगल

रे भारतीय युवकांनो
नवहिंद शूर युवतींनो
ऐका रे स्वातंत्र्याची
अमर कथा ही बिजलीची

दा. क्र. २४३ दिनांक
विषय किशोर क्र. २२२

जय
न पुणें ४

BVBK-0400243
BVBK-0400243

२७६

संजय प्रकाशन–शहाण्णव

प्रकाशिका
सौ. ललिता शंकर भावे
संजय प्रकाशन
९१७/२२ फर्ग्युसन कॉलेज रोड
पुणे–४

© न. दि. दुगल

प्रथमावृत्ती :–
१४ जानेवारी १९७६
मकर संक्रात शके १८९७

मूल्य–चार रुपये

मुखपृष्ठ व प्रसंगचित्रे रमेश मुधोळकर

मुद्रक
सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८ शुक्रवार पेठ
पुणे–२

प्रती :–३१००

( या पुस्तकासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने दिलेला सवलत दरातील कागद वापरला आहे. आभारी आहोत. )

आईप्रमाणेच अल्पवयात
आपली तेजस्विता प्रगट करून
दिवंगत झालेल्या माझ्या आवडत्या बहिणी
किशी (कृष्णा)
( कै. चि. सौ. कमल भालचंद्र लोंढे )
आणि
कुसुम
( कै. चि. सौ. मालती विनायक आगाशे )
यांच्या प्रेमळ स्मृतीस

– दादा
(न. दि. दुगल)

BVBK-0400243

## सिंहीणीच्या गुहेत डोकावण्यापूर्वी

गोकुळाष्टमीच्या शुभमुहूर्तावर बालकुमार साहित्य संमेलन प्रसंगी कुमारकुमारिकांचे मनोगत समजून खूप समाधान वाटले.

कौमार्यावस्थेत इंदिरा प्रियदर्शिनीने ' जोन ऑफ आर्क ' होण्याची आपली मनीषा आपल्या पिताजींना सांगितली होती. पंतप्रधान इंदिराजींची ह्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षातील घोड-दौड कानात घुमत आहे.

झांशीच्या राणी लक्ष्मीचे विलक्षण वेड असलेल्या माझ्या कन्ये-बरोबर ' सेंट जोन ' हे नाटक वाचीत असता जोन आणि राणी लक्ष्मी ह्या दोघींनी माझ्या मनाला झपाटून टाकले.

आणि एकाएकी ' बिजली ' माझ्यासमोर प्रगट झाली. ' एक होती सिंहीण ' असं म्हणून तिची कथा सांगण्यास मी सुरुवात करताच कुमार-कुमारींनी कान टवकारले. मंत्रमुग्ध होऊन ते अखेरपर्यंत ऐकत राहिले. ' संजय ' भावे यांनी ही कथा महा-राष्ट्रातील सर्व कुमार–कुमारींपर्यंत पोचविण्याचे ठरविले. ह्या-बद्दल त्यांचे कुणी कुणी नि किती आभार मानावे ?

# १

' हे बघ बिजे, आईविना पोर म्हून लई लाड केले तुझे मी आजपवतर. पर आता तू ल्हान न्हाईस. तुजा अवखाळपना खपून घ्येनार न्हाई ह्याफुडं ! तुला तोडून बोलन्याची येळ पुन्ना आनू नगंस ह्या तुझ्या बावर–' असं बिजलीला बजावून बजाबा शेतावर गेला. पल्याडच्या काळ्या कुळकुळीत भुईतून नुकतीच वर आलेली गव्हाची नि हरभऱ्याची रोपं हिरवीगार दिसत होती. मधेच फुलावर आलेलं कोरटयाचं शेत पिवळ्या गालिच्यासारखं वाटत होतं. मधे मधे अंबाडीची लाल फुलं डोळ्यांत भरत होती. कणसं निसवलेलं ज्वारीचं शेत उन्हात पोपटी रंगाचं दिसत होतं. ह्या पुरुषभर उंचीच्या पिकात बाप दिसेनासा होताच, बिजली अंगणात आपल्या आवडत्या पांढऱ्या शुभ्र बकरीजवळ जाऊन बसली. आईच्या अंगाला लगटून बसलेल्या तिच्या कोकराला मांडीवर घेऊन त्याला कुरवाळीत ती विचारात गढून गेली.

' काल जरा चुकलंच आपलं. लईच उशीर झाला घरला पोचायला. पण इलाज काय ? नदीचा तो वेगानं वाहत जाणारा

प्रवाह पुन:पुन्हा डोळे भरून पाहण्याची आपली ओढ कुणाला कशी समजावून सांगू मी ?' असं मनाशी म्हणत असताना डोळ्यांपुढं ते महानदीचं खळाळणारं रूप दिसू लागलं. काल बजाबा नेहमीप्रमाणे दुपारची डुलकी झाल्यावर शेताकडे जायला निघाला तेव्हा बिजली त्याला म्हणाली होती, 'बाबा, मी आता न्हाई येत शेतावर. सकाळ धरून लई काम केलंय आज. गुलूसंगं रपेट करायची हाय.' आणि लगेच पडवीत जाऊन गुलछडीचं तोंड कुरवाळून तिनं तिच्या पाठीवर थाप मारली. त्याबरोबर घोडीचं अंग थरारलं. नाकपुड्या फेंदारून तिनं आपल्या खिकाळण्यानं बिजलीच्या बेताला अनुमती दिली. बजाबाच्या कल्याणी घोडीचं हे शेवटचं शिंगरू बिजलीनं मोठ्या प्रेमानं वाढवलं होतं. अतिशय देखणी होती गुलछडी. बिजलीचं तिच्याशी एवढं सख्य होतं की एखाद्या मैत्रिणीसारखी ती तिच्याशी गुलूगुलू गोष्टी करायची. आपल्या गुलूला काल तिनं खूप दूरवर दौडवलं होतं. गाडीरस्त्यानं काही अंतर गेल्यावर सूर्याच्या भगभगीत उन्हातून घोडीला तिनं बाजूच्या शांत, शीतल जंगलाच्या वाटेवर नेलं. जवळजवळ मैल दीड मैल घनदाट जंगल पसरलेलं होतं. वाटेच्या दोही बाजूंना असलेल्या झाडांच्या फांद्या एकात एक गुंतून जागोजाग जाळीदार सावली पडली होती. जणू वनदेवतांनी त्या दोघींसाठी बिब्ब्याच्या कातड्याच्या पायघड्या घातल्या होत्या ! झाडी तुटून मोकळ्या झालेल्या उंच वळणावर आल्यावर तिनं घोडीवरून खाली अलगद उडी घेतली. ह्या ठिकाणी नदी डोंगराला लगटून खेळत खिदळत अल्लड मुलासारखी धावत सुटली होती. पलीकडल्या एका झाडाला गुलछडीला बांधून बिजली त्या प्रवाहाबरोबर उड्या मारीत

निघाली. मनसोक्त जलक्रीडा झाल्यावर ती घोडीजवळ परत आली. तोवर सूर्य मावळून संधिप्रकाशही धूसर झाला होता. चतुर्थीची चंद्रकोर वरून चांदणं बरसत होती पण झाडीमुळं ते खालपर्यंत तेवढं पोचत नव्हतं. घोडीच्या टापांचा आवाज कानांवर पडताच एखादा चितळ चौखूर उड्या मारून पलीकडे नाहीसा होई, तर मधेच एखादा ससा लांब लांब उड्या मारून या जाळीतून त्या जाळीत जाई. खांद्यावर तीक्ष्ण पात्याची कुऱ्हाड टाकून झपाझप चाललेला गोंड जवान तिला वाटेत भेटला. तो जिंदा होता. त्याने तिला जंगलातून बाहेर पडेपर्यंत साथ दिली. सूर्यास्ताला शेतावरून परत आलेला बजाबा अंगणातच बिजलीची वाट पाहत बराच वेळ बसला. शेवटी काळजीनं त्याला स्वस्थ राहवेना तो. उठून चालू लागला. एवढ्यात बिजली येऊन पोचली. तिला पाहताच त्याचा जीव थाऱ्यावर आला. त्याच्या तोंडून मात्र रागाचे शब्द बाहेर पडले. बिजली मुकाटपणे घरात शिरली गुलछडी पण गुपचूप राहिली पडवीत.

कालचा हा सारा प्रसंग अन्तर्मनाने पुन्हा तिच्या डोळ्यांसमोर उभा राहिला होता. त्या तंद्रीतून भानावर येताच ती उठली आणि गुलूला साद घालीत पडवीत गेली. तिचा प्रेमळ हात अंगावरून फिरताच घोडीचं अंग थरारलं. नाकपुड्या वर करून ती खिंकाळली. तोंड मागे वळवून आपले मोठे मोठे डोळे तिने बिजलीवर रोखले. 'तुझ्यासंगं कुठंही यायला तयार आहे मी' असंच जणू ती आपल्या मालकिणीला आश्वासन देत होती. तिच्याशी बोलत बोलत बिजलीनं तिला बाहेर काढली नि सफाईनं ती तिच्यावर स्वार झाली. आज जवळच्याच रस्त्यानं ती नदीशी पोचली. महानदीचा तो प्रसन्न प्रवाह पाहताच बिजलीचं

मन प्रसन्न झालं. नदीच्या पात्रात ह्या ठिकाणी दोन मोठ्या डोण्या तयार झाल्या होत्या. शिवकुंड नि उमाकुंड अशी त्यांना नावं होती. त्या कुंडांमध्ये सुस्नान होण्याइतपतच पोहून बिजली पलीकडच्या तीरावर गेली. तेथे एका खडकावर काळ्या पाषाणांनी बांधलेलं मंदिर होतं. ह्या मंदिरातील घंटानादाचा बिजलीच्या मनावर विलक्षण परिणाम व्हायचा. मंदिरात शिरल्या-वर घंटा वाजवून बिजलीनं देवीला दंडवत घातलं नि देवीसमोर बसून तिच्याकडं टक लावली. एक विलक्षण तेज तिच्या अंगी संचरलं. तिचं मुख उजळून निघालं. ह्या अवस्थेत तिला देवीचा साक्षात्कार झाला. देवीने तिला तिचे जीवितकार्य स्पष्ट केले, तिच्या अंतर्मनी ते ठसवले. त्या धुंद समाधी अवस्थेतच ती नदी पार करून गेली. तीरावर गुलू तिची वाट पाहत स्तब्ध उभी होती. तिच्यावर स्वार होऊन ती सूर्य डोंगराआड जाण्यापूर्वीच घरी पोचली. सूर्यास्ताला बजाबा घरी आला तेव्हा बिजली घरात असलेली पाहून त्याला समाधान वाटलं.

रात्रीची जेवणं उरकल्यावर बजाबानं अंगणात घोंगडी टाकली. कार्तिकातलं टिपूर चांदणं सृष्टीवर पसरलं होतं. मनाला एक प्रकारची ओढ लावीत होतं ते. त्या शांत, निवांत वेळी लेकीला तिच्या हिताच्या गोष्टी समजावून द्याव्या असं बजाबाच्या मनानं घेतलं. 'बिंजी ग !' अशी त्याची लाडिक हाक ऐकून बिजली अंगणात येऊन घोंगडीवर त्याच्या शेजारी येऊन बसली. तिला आपल्या पुढ्यात बसवून बजाबा तिला निरखीत राहिला. आपली ही पोर म्हणजे देवानं आपल्याला दिलेलं एक वरदानच आहे, असं बजाबाला मनोमन वाटे. बिजलीला नुकतंच पंधरावं वरीस लागलेलं होतं. ती रंगाने गोरी नसली तरी तिची अंगकांती रस-

रशीत नि विलक्षण आकर्षक होती. तिचे अवयव रेखीव होते नि मूर्ती बांधेसूद होती. लहानपणापासून तिला पोहण्याचे नि घोडदौड करण्याचे वेड होते. त्यामुळे ती चपळ आणि कणखर बनली होती. डोंगरदऱ्यांतून ती निर्झराप्रमाणे स्वच्छंदपणे फिरे. तिच्या डोळ्यांत विलक्षण तेज होतं नि चेहऱ्यावर बुद्धीची चमक होती. तिची बोलण्याची हातोटी अशी होती की, ऐकणारा भारावून जाई नि तिचं म्हणणं मान्य करी.

जरा वेळ इकडच्या-तिकडच्या गप्पागोष्टी झाल्यावर बजाबाने बिजलीला आलेल्या मागणीबद्दल गोष्ट काढली. त्याबरोबर बिजली



बिथरली. धारदार आवाजात ती म्हणाली, ' हे बघ बाबा, दुर्गादेवीनं मला आज कौल दिलाय. तिनं मला दिलेली तलवार काय

गुंजत ठेवून देऊ? आपल्या देशात शत्रूचा केवढा धुमाकूळ चाललाय! नि मी लगीन करावं म्हणतोस? नाही, नाही, ते शक्य नाही! बाबा, मला सुभेदारांकडे घेऊन चल! त्याला मी सांगणार आहे की, मला महाराजांकडे पाठवण्याची व्यवस्था कर लवकर. महाराजांकडून सैन्य घेऊन मी भवानगडाचा वेढा उठवणार आहे. शत्रूला पार पिटाळून लावणार आहे. महाराजांना सिंहासनावर बसवून धर्मगुरूंकडून त्यांना राज्याभिषेक करवणार आहे. होय, बाबा, होय! नाही म्हणू नको. कसं समजून देऊ बाबा तुला माझं मन? दुर्गादेवीनं मला आण घातलीय. उद्याच्या उद्या मला तू सुभेदाराकडे घेऊन चल!'

धबधब्याप्रमाणे कोसळणाऱ्या बिजलीच्या तेजस्वी शब्दांनी बजाबा भारावून गेला. अवाक होऊन तो तिच्याकडे पाहत राहिला. तिच्या मुद्रेवरील भाव इतका विलक्षण होता की, ही आपली मुलगी सामान्य नव्हे हे त्याच्या मनावर तत्क्षणीच ठसलं नि तो भारावून गेला. त्याला आठवलं की, बिजली लहान असताना समवयस्क मुलांबरोबर लुटूपुटीची लढाई खेळत असता अंगणात एक संन्यासी आला. कशाचीही मागणी न स्वीकारता तो सांगून गेला की, 'ही पोर फार थोर भाग्याची आहे. ही वयात येईल तेव्हा ती जे सांगेल त्याप्रमाणे तुम्ही करा. तिच्या आड कुणीही येऊ नका.' बजाबाच्या कानात हे शब्द घुमत राहिले नि तो बिजलीच्या खांद्यावर थोपटत स्तब्ध बसून राहिला. रोहिणीचा योगतारा पूर्वा उजळीत असलेला त्याला दिसला आणि त्याच्या मनातही प्रसन्नता उजळली.

★ ★

# २

भिलईमधला सुभेदाराचा वाडा म्हणजे भक्कम किल्ला होता. सुभेदार बलबीरसिंग वाड्यावर असे तेव्हा सर्व नोकरचाकर बिनबोभाट आपापली कामं करण्यात गढलेले असायचे. आज सकाळपासून मात्र वाड्यांत नि आजूबाजूला बरीच धांदल, गडबड उडून गेलेली होती. बलबीरसिंग तगडा जवान, सुभेदार, नि त्याचा दराराही मोठा. खाण्यापिण्यात तो बराच तालेवार होता. सकाळच्या न्याहारीला त्याला आज एकही अंडं मिळालं नव्हतं. रोजची निदान १०।१५ अंडी तरी मिळावी म्हणून त्याने जातिवंत कोंबड्या पाळलेल्या होत्या. त्यांची देखभाल करण्याचं काम भिवावर सोपवलेलं होतं. तेव्हा भिवावर त्यानं सारा राग काढला होता. शेवटी भिवा त्याला धीर करून म्हणाला, 'सुभेदारजी, म्या गरिबानं काय केलंय ? आपल्या वाड्यातल्याच काय पण अख्ख्या भिलईतल्या एकाही कोंबडीनं आज अंडं घातलं नाही. लोक बोलतात की शिवनीच्या देवदूतीची भेट घ्यायचं सुभेदारजींनी नाकारलं म्हून ह्ये असं झालंया.' 'मूर्खा, ती पाटलाची पोर

देवदूती होय ?' असं तो त्याच्यावर डाफरला तेव्हा भिवा गप्प बसला.

शिवनीहून अष्टमीला निघून बजाबा दोन दिवसांपूर्वीच बिजलीसह भिलईला आला होता. पुष्कळ अर्जविनंत्या झाल्या. बजाबानं मिनतवारीनं सुभेदारजींना विनवलं तरी काही उययोग झाला नव्हता. 'त्या वेडसर पोरीची भेट घ्यायला हा बलबीरसिंग रिकामा नाही,' असं त्यानं अखेरचं सांगितलं तेव्हा बजाबा बेचैन झाला. शेतीचं कामं टाकून त्याला ब्रिजलीबरोबर यावं लागलं होतं. बिजलीनं त्याला आश्वासन दिलं की, 'माझी दुर्गादेवी ह्या सुभेदाराला माझी भेट घ्यायला लावीलच. आणि मग माझ्या म्हणण्याप्रमाणं त्याला करायलाच लावीन मी. ही देवीची योजना आहे. चार शिलेदार माझ्यासंगं यायला राजी आहेत. तू काळजी करू नगंस. एक चिलखत, पोषाख आणि महाराजांसाठी खलिता घेणारच मी सुभेदाराकडून. तू गुमान घरला जा. माझी काळजी करू नगंस, बाबा!' 'तू महाराजांकडं निघालीस की मला निरोप पाठीव–' असं बिजलीला पुनः पुन्हा सांगून पहाटेच बजाबा निघाला होता शिवनीला जायला.

भिवा भीत भीत पुन्हा आत येऊन मुजरा करून उभा राहिला.

'काय आहे रे ?' घुश्श्यातच विचारलं बलबीरसिंगानं.

'धनी, शिलेदार सावंत भेट मागतायत.'

'पाठवून दे त्यांना आत.'

'जी!' म्हणत धावत जाऊन त्यानं सावंत शिलेदारांना आत पाठवून दिलं. मुजरा करून सावंत नम्रपणे उभे राहिले. 'बसा!' असं त्यांना सांगून सुभेदारजींनी त्याच्याकडे रोखून पाहिले. जरा वेळाने तीव्र स्वरात ते म्हणाले, 'हे पाहा सावंत, तुम्ही ह्या

मुलीचा नाद सोडा. उगीच तिची रदबदली करण्याच्या भानगडीत कशाला पडता पुन्हा ?'

त्यावर सावंत धीटपणे वर पाहत म्हणाले, 'सुभेदारजी, आपल्याला वाटतं तशी ही मुलगी वेडसर तर नाहीच नाही; पण ती एक असामान्य स्त्री आहे. तिच्यामध्ये दैवी तेज आहे. तिला देवीचा दृष्टांत झालेला आहे. ती आपल्या गावात आल्यापासून किती विलक्षण गोष्टी घडत आहेत ! आपल्या सैन्यातल्या शिपाई-गड्यांत तिनं वेगळंच चैतन्य निर्माण केलं आहे. तिच्याकडे वाईट नजरेने पाहण्याची तर कोणाचीच हिंमत नाही. उलट सगळे कसे पवित्र, शुद्ध भावाने वागत आहेत. एकाच्याही तोंडून आता शिवीगाळ बाहेर पडत नाही. लोक तिला केवढं मानतात ते पाहा तरी जरा ! माझी पुन्हा आपल्याला विनंती आहे की तिला भेटीला बोलवा आणि तिचं सांगणं ऐका.'

आपल्यापुढे ज्याच्या तोंडून धड चार शब्दही कधी निघत नाहीत तो हा सावंत भडाभडा इतकं बोलतोय ह्याचं सुभेदारांना फार आश्चर्य वाटलं. त्यांच्या मनात एकदम काय आलं कोण जाणे ! त्यांनी भिवाला हाक मारली. तो येताच ते त्याला म्हणाले. 'ती मुलगी कुठं उतरलीय ते ठाऊक आहे का तुला, भिवा ?'

'कोण, त्या बिजलीबाई ना ? हाय ठावं.'

'बलबीरसिंग सुभेदारजींनी ताबडतोब त्यांच्यापुढं हजर व्हायला फर्मावलंय असं जाऊन सांग तिला नि घेऊन ये ताबड-तोब !' हे ऐकताच भिवा आनंदून गेला. 'लई ब्येस, लई ब्येस, धनी !' म्हणत धावतच निघाला तो.

वाड्याच्या बाहेर पडतो न पडतो तोच समोरून घोड्यावर

बसून बिजली येत असलेली त्याला दिसली. तिला लवून रामराम करून भिवाने सुभेदारांचा निरोप सांगितला. घोडी बरोबरच्या एका शिपाईगड्याच्या हाती देऊन बिजली तडक भिवाबरोबर वाड्यात शिरली.

'रामराम सुभेदार बलबीरसिंगजी!' हे तिचे खणखणीत शब्द कानी पडताच सुभेदार चमकला. सावंतांच्या तोंडून त्यांनी बिजलीबद्दल आणखी पुष्कळ ऐकलं होतं नि त्याचा त्यांच्या मनावर चांगला परिणाम झाला होता.

'हं, बस तिथं' असं त्यांनी बिजलीला म्हणताच ती आनंदून गेली. उभं राहाण्याची तिची ऐटबाज ढब पाहाणाऱ्याचं लक्ष वेधून घेणारी होती. न बसताच ती सुभेदारजींपुढं किंचित झुकून बोलू लागली.

'सुभेदारजी, देवीनं तुम्हाला कौल दिला ना अखेर? माझी भेट घ्यायला तुम्ही राजी नव्हता. मला भेटीला बोलावून तुम्ही देवीचं म्हणणं ऐकलं. आता माझी छोटीशी मागणी मान्य करा आणि दुर्गादेवीचा आशीर्वाद मिळवा.'

'बरं, बरं! काय मागणं आहे तुझं? महत्त्वाची कामं सोडून तुझ्याबरोबर गोष्टी करायला वेळ नाही मला. बोल लवकर तुला काय हवंय ते.'

'सुभेदारजी, ह्या सावंत शिलेदारांप्रमाणेच आणखी तीन शिलेदार माझ्यासंगं यायला राजी आहेत. मला महाराजांकडे घेऊन जाण्याचा त्यांना हुकूम द्या. मला एक चिलखत व शिपाईगड्याचा पोषाख द्या, आणि महाराजांसाठी माझ्याजवळ खलिता द्या. एवढंच माझं मागणं!'

'मोठी सरदारीण लागून गेलीस की नाही तुला चार शिलेदारांसंगं महाराजांकडे पाठवून द्यायला ?'

'हे पाहा सुभेदारजी, ही देवीची आज्ञा आहे. तिनं मला दृष्टान्त दिलाय त्याप्रमाणं सगळं घडणाराय. भवानगडचा वेढा उठवायला तिनंच मला आज्ञा केलीय. त्यासाठी जरूर तेवढे सैन्य महाराज माझ्या हाताखाली देतील. तुम्ही तेवढा खलिता द्या आणि ह्या चार शिलेदारांना हुकूम द्या. हे देवीचं काम तुम्ही करणार आहात. आणि माझा पहिला मदतनीस म्हणून तुमचं नाव अजरामर होणार हाय.'

आकाशवाणीसारखं बिजलीचं बोलणं सुभेदाराच्या मनावर परिणाम करीत होतं. एकदम भानावर आल्यासारखं त्यांनी सावंतांना विचारलं.

'सावंत, हिच्याबरोबर जायला कोण कोण तयार आहेत ?'

सावंतांनी लगेच सांगितलं की ते स्वतः तर तयार होतेच पण त्यांचे तीन दोस्त तर अगदी उत्सुक आहेत तिच्यासंगं जायला. मग त्यांनी त्या तिघांची सविस्तर माहिती दिली.

'ठीक, ठीक !' असं सुभेदार उद्गारताच भिवा अंड्यांची करंडी घेऊन धावत आला.

'सुभेदारजी, सुभेदारजी ! ही बघा अंडीच अंडी. केवढा चमत्कार ! आपण बिजलीबाईना भेटीला बोलावलंत नि तिकडे कोंबड्यांनी अंडी घालायला सुरुवात केली. केवढा हा देवीच्या कृपेचा साक्षात्कार !'

'खास हिच्यात काही तरी दैवी असं आहे अशी स्वतःच्या मनाशी कबुली देत त्यांनी कारकुनाकडून खलिता तयार करवून

घेतला. बिजलीच्या पोषाखाची नि चिलखताची व्यवस्था केली. आणि त्या चार शिलेदारांना आज्ञापत्र काढलं.



शिलेदारासारखा पोषाख करून बिजली जेव्हा घोडीवर स्वार झाली तेव्हा ती त्या चार शिलेदारांची वरिष्ठ अधिकारी कोणी तरुण सरदार अशी शोभत होती. ते निघाले तेव्हा बरेच गावकरी त्यांना सीमेपर्यंत निरोप द्यायला गेले. फर्लांगभर गेल्यावर वाटेत बाभळीचे बन लागले, इवलाल्या पिवळ्या गेंदाचा खच रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पडला होता. हिरव्या विरळ पानांच्या फांद्यांना लागलेले पिवळ्या गेंदाचे तुरे डोळ्यांना सुखवीत होते. तसाच त्यांचा मस्त सुवास मनाला आनंद देत होता. एका ओढ्याच्या काठी थांबून त्यांनी घोड्यांना पाणी पाजले. ते स्वच्छ झुळझुळतं थंड पाणी प्याल्यावर त्यांनाही नवा उत्साह आपल्या अंगी

संचरला असं वाटलं नि त्यांची घोडदौड जोरात चालू झाली. पायवाटेच्या दोन्ही अंगांना आता घनदाट वनराजी होती. मोहाची झाडे आंब्याप्रमाणे हिरव्या पानांच्या संभाराने शोभत होती. आपल्या अंगावर हत्तीच्या कानासारखी मोठ्ठाली पसरट पाने धारण करून नि आपले तुऱ्यांचे झेंडे आकाशात उंच फडकावीत सरळसोट साग उभे होते,

'ज्या त्या ठिकाणी जी ती झाडे जशी शोभतात तसंच माणसांचं आहे. देवानं ज्याला त्याला आपला देश दिला आहे, स्वतःची भाषा दिलीय. आपल्या मातृभूमीचं नि मातृभाषेचं रक्षण करणं हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे. हे कर्तव्य जाणून प्रत्येकानं ते पार पाडण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे; शर्थ केली पाहिजे–' अशा शब्दांत बिजली आपल्या साथीदारांना स्फूर्ती देत चालली होती. त्यांच्यात एक आगळीच जिद्द निर्माण करीत होती. स्वच्छ निळं आकाश आणि चांदण्या रात्री. त्यामुळे त्यांना दररोज मोठी मजल मारता येत होती. वाटेत स्वच्छ शीतल पाण्याने वाहणारे निर्झर, नद्या यांच्यामुळे प्रवासाचा शीण हलका होत होता. बिजलीचे नेतृत्व हा एक अखंड स्फूर्तीचा झरा.बिजलीने वरून निघण्यापूर्वी आपल्या विश्वासातल्या गोंड तरुणांना एकत्र जमवून आपला बेत त्यांना थोडक्यात सांगितला होता. त्यांचं तिरंदाजांचं जे पथक होतं. ते जय्यत तयार ठेवण्यास तिने त्यांच्यातील दोन टोळ्यांचे प्रमुख जिंदा व भिमा यांना बजावलं होतं. त्यांनी वाटेवरल्या गावात निरोप पाठवून बिजली व तिचे शिलेदार यांची खाण्यापिण्याची सोय करवून ठेवली होती- त्या त्या गावी तरुण एकत्र जमून बिजलीचे स्फूर्तिप्रद शब्द ऐकून चेतवले जात होते. त्यांच्यापैकी काहीजण तर इतके उतावीळ होत की ते लगेच बिजलीबरोबर

जाण्याची भाषा बोलत.

पण बिजलीने त्यांना समजावणीच्या शब्दांनी थोपवून धरले. ज्याला जे हत्यार चालविता येत असेल त्याचा सराव त्यानं करीत राहावं आणि तिचा निरोप येताच त्या त्या ठिकाणी लगेच हजर व्हावं अशा सूचना ती देत होती. विशेषतः तिरकमठा-बहाद्दर जवानांचं मोठं दल तयार होण्याच्या दृष्टीनं तिनं ठिक-ठिकाणी व्यवस्था केली. तिला आपला बेत सिद्धीस जाणारच याबद्दल इतकी खात्री होती की तिच्या तोंडून अनिश्चितपणा दर्शविणारा शब्दही येत नसे. चार शब्द बोलून ती देवीची प्रार्थना करी नि लगेच घोडीवर स्वार होऊन दौडत निघे. लोक भारले गेल्यासारखे तिच्या अंकित होत होते. विलासपूरला केव्हा एकदा पोचतो असे तिला झालेले होते. त्यामुळे ती कोठेही जरुरीपेक्षा थोडाही जास्त मुक्काम करीत नव्हती. ते शिलेदारही बिजलीच्या सान्निध्यात इतके भारले गेलेले होते की, ते तिच्या शब्दाबाहेर जाण्याचे मनातही आणीत नसत. वाटेत राजनांदगावला तपास केला तेव्हा युवराज महाराज विलासपूरला गेलेले आहेत असे त्यांना समजले. त्याबरोबर त्यांनी लगेच पुढे कूच केले.

★ ★

# ३

विलासपूरच्या राजवाड्यात त्रिपुरी पौर्णिमेचा उत्सव साजरा होत होता. राजमाता विलासिनी भरजरी पैठणी सावरीत अंतः-पुरातून खास महालात आली. बहुमोल उपकरणांनी ह्या महाल सुशोभित केलेला होता. सप्तरंगी दगडांचा गालिचा व त्यावर रत्नखचित सुंदर फुले शोभत होती. भिंतींवर अप्रतिम चित्रे काढलेली होती आणि खांबांवर नाजुक नक्षीकाम केलेले होते. सबंध राजवाड्यावर विशेष रोषणाई केलेली होती. स्फटिकशिलांचे मनोरे चंद्रबिंबाच्या तेजाशी स्पर्धा करीत आकाशात डौलाने राजवैभवाचा दिमाख मिरवीत होते.

विलासिनी महाराणीच्या मर्जीतील सरदारांना व सेनाधिका-ऱ्यांना चांदण्यातील भोजनाचे निमंत्रण होते. प्रत्येक पात्राकरिता रंगीत चौरंग मांडलेला असून बाजूला सोनेरी, रूपेरी नक्षीची पात्रे ठेवलेली होती. खाशा स्वाऱ्यांसाठी सोन्याच्या फुल्यांचे व बाकीच्यां-साठी चांदीच्या फुल्यांचे चंदनी व शिसवी पाट मांडलेले होते. सरनोबत चंडवर्मा स्वतःच्या देखरेखीखाली सर्व व्यवस्था करवून

घेत इकडून तिकडे मिरवत होता. पलीकडे मैफलीचे दालन होते. तेथे नृत्यगायनाचा कार्यक्रम होणार होता.

चंडवर्मा हा विलासिनी महाराणीचा भाऊ. विलासिनी ही महाराज सूर्यसेन यांची द्वितीय पत्नी. प्रथम पत्नी महाराणी तेजस्विनीदेवी पहिल्याच बाळंतपणात दिवंगत झाली. राजपुत्र अभयसिंह दाईच्या दुधावर वाढला. सूर्यसेन महाराज हे अत्यंत प्रजाहितदक्ष, शूर, राज्यकार्यधुरंधर, रघुवंशातील राजांप्रमाणे प्रजेचे पुत्रवत पालन करणारे होते. राजा जनकासारखी त्यांची विदेही वृत्ती होती. तेजस्विनीदेवींच्या मृत्यूनंतर ते पूर्णपणे. विरक्त झाले होते पण महाराणीविना राजसिंहासनाला शोभा नाही, प्रजेला पिता आहे पण माता नाही, तेव्हा महाराजांनी द्वितीय विवाह करणे आवश्यक आहे असा आग्रह धरून राजगुरूंनी त्यांचं मन वळवलं होतं. द्वितीय संबंध राज्याचे आधारस्तंभ सरदार रणधीरसिंग यांची कन्या विलासिनी हिच्याशी जोडण्यात आला. विलासिनी लाडात वाढलेली आणि स्वतःच्या रूपाचा गर्व वाहणारी होती. महाराजांना आपल्या मुठीत ठेवण्याचा तिने आटोकाट प्रयत्न केला होता. पण राज्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारे ठेवून राज्यकारभार चोखपणे करण्यात सूर्यसेन महाराज सदैव गढलेले असत. रायपूरचा त्यांचा राजवाडा कर्तबगार राजाला शोभेसा होता. सर्व सोयींनी युक्त असून तो किल्ल्यासारखा भक्कम होता. पण विलासिनी महाराणीच्या सुखलोलूपवृत्ती त्या राजवाड्यात रमत नसत. तिने आग्रह करकरून नि शेवटी हट्टाला पेटून विलासपूरचा राजवाडा तिच्या मनाजोगता बांधून घेतला होता. सुंदर, भव्य दालने, विलासी शयनगृहे, शृंगारलेले आरसे-महाल, थुईथुई कारंजी उडत ठेवणाऱ्या पुष्करिणी, लतामंडपांनी

आणि विविधरंगी फुलझाडांनी भरलेल्या बागा, उद्याने, नि दुर्मिळ कलावस्तूंनी नटलेली संग्रहालये ह्या गोष्टींनी हा राजवाडा म्हणजे जणू पृथ्वीवरील इंद्रपुरीच वाटत असे. हा राजवाडा बांधून झाल्यापासून विलासिनी महाराणींचा मुक्काम इथं वारंवार होत असे. सूर्यसेन महाराज ह्या राजवाड्यात क्वचितच मुक्काम करीत आणि स्वत:ला मूलबाळ न झाल्याने सवतीच्या मुलाचा दु:स्वास करणारी विलासिनी अभयसिंहाला सहसा ह्या राजवाड्यात मुक्काम करू देत नसे. आठ वर्षांपूर्वी एकाएकी सूर्यसेन महाराजांचा देहांत झाला. त्यावेळी अभयसिंह केवळ बारा वर्षांचा होता. महाराजांनी त्याच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केलेली होती आणि त्यासाठी त्याला राजनांदगावच्या छोट्या राजवाड्यात ठेवले होते. महाराजांचा मृत्यू अकाली आणि अचानक झालेला होता. पुढची काहीच व्यवस्था त्यांच्याकडून झालेली नसल्यामुळे महाराणी विलासिनी व तिचा भाऊ चंडवर्मा ह्यांना मोकळे रान मिळाले होते. वडिलांच्या मृत्यूनंतर चंडवर्म्याकडे सरदारकी आलेली होती. आता त्याने स्वत:ला सरनोबत हा किताब महाराणीकडून घेऊन सरसेनापतीचे बरेचसे अधिकार स्वत: बळाकावले होते. त्या दोघांचा मुक्काम आता कायमचाच विलासपूरच्या राजवाड्यात होता. तेथेच दरबार भरू लागला. युवराज अजून वयात आलेले नव्हते, आणि त्यांचे शिक्षण राजनांदगाव येथे चालू होते. प्रधानजी रायपूरला राहून राज्यकारभाराची सूत्रे हलविण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांच्या सल्ल्याला आता पूर्वीचा मान नव्हता, आणि स्वतंत्रपणे ते काही करू शकत नव्हते.

ह्या घडामोडींचा विपरीत परिणाम जाणवू लागला होता.

शेजारील मुलखात शक लोकांचा शिरकाव झालेलाच होता. लहान लहान राज्ये घशात घालून ते प्रबळ होत चालले. दोन वर्षांपूर्वीच कुरापत काढून त्यांनी सूर्यसेनाच्या राज्यातील लोहगड बळकाविला होता. त्यांचा उपद्रव वाढू लागला तरी त्यांचे पारिपत्य होईना, तेव्हा ते शिरजोर झाले आणि लागोपाठ ४-५ किल्ले हस्तगत करून त्यांनी रायपूर राजधानीवर धडक मारली. प्रधानजींनी राजधानी वाचविण्याची शर्थ केली. पण चंडवर्म्याने सरसेनापतींना वेळेवर तिकडे जाऊच दिले नाही. उलट शत्रूशी तह करून त्याने रायपूर शत्रूला देऊन टाकले, आणि त्या मोबदल्यात स्वतःसाठी विपुल धन आणि जहागीर मिळवली. आता त्याचा पाताळयंत्रीपणा सुरू झाला. आपला मुलगा महाराणी विलासिनीने दत्तक घ्यावा अशी खटपट त्याने सुरू केली. पण अभयसिंहावर प्रजेचे प्रेम असल्याने महाराणी हे करण्यास धजावत नव्हती. तेव्हा चंडवर्म्याने युवराज अभयसिंहाचे जे हितकर्ते होते त्यांचा हळूहळू नायनाट करण्यास आरंभ केला. युवराजाचा मुक्काम राजनांदगाव येथे असे. अगदी महत्त्वाच्या प्रसंगी व राजगुरू आग्रह करीत तेव्हाच तो विलासपूरला येई. आता विलासपूर हीच राजधानी झाली होती. दरबार भरे तेव्हा तो सिंहासनावर संकोचून बसे. शेजारी छोट्या सिंहासनावर बसून राजमाता विलासिनीच बहुतेक बाबतीत निर्णय घेई व हुकूम सोडी. तिच्या डाव्या हाताला बसून चंडवर्मा तिला सल्लामसलत देई. अभयसिंह मोठ्या चमत्कारिक अवस्थेत होता. तो आता वयात आला होता तरीही राज्याभिषेक समारंभ काही ना काही सबबीवर लांबणीवर टाकण्यात येत होता. निराशेनं ग्रासला जाऊन तो दुर्बल बनत चालला होता. आधीच त्याच्या वृत्तीला हत्या मानवत

नव्हती. त्यामुळे युद्धाचा त्याला तिटकारा होता.

खालच्या दालनात आणि खास महालात मेजवानीची व मैफलीची तयारी चालू होती. त्यावेळी अभयसिंह सौधावर चांदण्यात फेऱ्या मारीत होता. मधेच विचारमग्न होऊन तो दूरवर पाहत उभा राही. गतवर्षी कार्तिकी उत्सव नि त्याआधी चार दिवस भरणाऱ्या दरबारासाठी तो येत असताना घडलेला प्रसंग त्याच्या मनःचक्षूंपुढे जणू नुकताच घडल्यासारखा स्पष्टपणे येत होता. दशमीच्या सकाळच्या मुहूर्तावर राजनांदगावहून निघण्याचा त्याचा बेत होता. पण नवमीलाच संध्याकाळी विलासपूरहून खास दूत आले. चंडवर्मा नि महाराणी यांनी युवराजांसाठी खास निरोप पाठविला होता की, महत्त्वाचे काम असल्याने त्याने ताबडतोब निघावे. नि शक्य तितक्या त्वरेने मुक्काम गाठता यावा म्हणून त्या दूतांबरोबर एक अत्यंत चपळ अशी खास घोडी त्यांनी पाठविली होती.

घोडीवर स्वार होताच अभयसिंहाने घोडीला टाच मारली. तेव्हा ती वायुवेगाने निघाली आणि थोड्याच वेळात दाट अरण्यात शिरली. अभयसिंहाने घोडीला आवरण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते जनावर अनावर होऊन भडकले. त्या निबिड अरण्यातून ती इतक्या वेगाने दौडत होती की, आपण कुठल्या दिशेला जात आहोत हेही अभयसिंहाला कळेना. मार्गात झाडांच्या फांद्या त्याच्या डोक्याला नि अंगाला घसटून लागू लागल्या. लगाम खेचून त्याने घोडीला आवरण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला. शेवटी एकदाची ती थांबली त्याबरोबर अभयसिंहाने तात्काळ खाली उडी टाकली. वेड्यावाकड्या मार्गाने तो कसातरी

अरण्याच्या बाहेर पडला. त्या दूतांचा कुठे पत्ताच नव्हता. आता उघडयावर आल्याने चंद्राच्या स्वच्छ प्रकाशात आसमंत उजळून निघालेला त्याला दिसला. डोंगराच्या कातळकडयाशी तो पोचलेला होता. नदीचा प्रचंड प्रवाह धो धो आवाज करीत खालच्या घळीत चालला होता. नदीच्या प्रवाहावर झुकून प्रचंड काळेभोर पाषाण पाण्यात प्रतिबिंबित होत होते. त्यांच्या त्या लांबच लांब अक्राळ-विक्राळ सावल्यांनी नदीचा प्रवाह ठिकठिकाणी काळवंडून जाऊन अजगरासारखा भेसूर दिसत होता. निसर्गाच्या त्या उग्र सह-वासात सारी रात्र त्याने कशी घालविली त्याचे स्मरण होऊन आत्ताही त्याचे हृदय थरारले.

उजाडताच तो निघाला नि थोडयाच अंतरावर त्याला काही गोंड जवान भेटले. त्यांनी त्याला अल्पावधीत राजरस्त्यावर आणून सोडले. दुपारच्या सुमारास तो विलासपूरला पोचला. त्याला पाहताच विलासिनी महाराणी नि चंडवर्मा यांची मुखे काळवंडून गेली. काळजीचा आव आणून त्यांनी युवराजाच्या प्रवासाबद्दल विचारपूस केली तेव्हा त्यांच्या मुखावरील भाव निरखीत असलेल्या युवराजाच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. त्यांनी त्याला आपल्या मार्गातून दूर सारण्यासाठी हा डाव टाकला होता पण युवराजाच्या सुदैवाने तो डाव फसला होता.

तो राजगुरूंना भेटला तेव्हा ते आश्चर्यचकित झाले. दशमीचा मुहूर्त त्यांनी काढून दिला होता. त्याला पाहताच ते म्हणाले, ‘ हे काय युवराज महाराज? निघण्याचा बेत बदलला कसा?’ घडलेली सर्व हकीगत अभयसिंहाने सांगितली तेव्हा अलीकडे त्यांच्या मनात डोकावू लागलेला संशय पक्का झाला. राजगुरू

ह्या नात्याने आपले कर्तव्य आपण केलेच पाहिजे असा ठाम निर्णय त्यांनी घेतला. आणि सूर्यसेन महाराजांच्या खास विश्वासातील सरदारांच्या साहाय्याने त्यांनी युवराजांना जपण्यासाठी डोळ्यांत तेल घालून त्यांच्यावर नजर ठेवली. त्यामुळे वर्षभरात कोणताही अनुचित प्रसंग घडला नव्हता.

★ ★

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २४३ दिनांक ......
विषय किशोर क्र. २२२

# ४

गेले चार दिवस विलासपुरात दरबारचं कामकाज चालू होतं. राज्यातील सर्व सरदार, काही सेनाधिकारी व इतर मानकरी यांच्या मुक्कामामुळे राजधानी गजबजून गेली होती. ह्याच वेळी बिजली आपल्या चार शिलेदारांसह येऊन पोचली होती. शत्रूने भवानगडाला दिलेला वेढा उठविण्यासाठी सरसेनापती रवाना झालेले होते. जे काही सैन्यातले थोडे अधिकारी विलासपुरात होते त्यांची बिजलीने गाठ घेतली होती. त्यापैकी हंबीररावावर तिच्या बोलण्याचा परिणाम झालेला होता. त्यांच्या हाताखालील शिपाईगड्यांमध्ये बिजलीचा विलक्षण प्रभाव दिसू लागलेला होता. ते सर्वजण तिच्या दुर्गादेवीवरील निष्ठेने व तिच्या तेजस्वी, स्फूर्तिप्रद बोलण्याने भारले गेले होते. आपल्याला दुर्गादेवीने भवानगडचा वेढा उठविण्याची आज्ञा केलेली आहे हे तिचे सांगणे त्यांना शब्दशः खरे वाटत होते व ते तिच्याबरोबर जाण्यास उत्सुक होते.

पाचव्या दिवशी. शिलेदार सावंतांनी बलबीरसिंग सुभेदारांचा खलिता सूर्योदयालाच युवराज महाराजांच्या हाती देण्यात यश

मिळविले होते. तो खलिता वाचल्यावर युवराज अभयसिंह उत्तेजित झालेला होता. दरबारच्या आजच्या अखेरच्या दिवशी युवराज महाराज रोजच्यापेक्षा पुष्कळच आधी आपल्या सिंहासनावर येऊन बसलेले पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. लगेच धावपळ झाली. काल रात्रीच्या चांदण्यातील समारंभामुळे आज सकाळी जरा शिथिलता आलेली होती ती एकदम नाहीशी झाली. सरनोबत चंडवर्मा घाईघाईने दरबारात आला. त्याबरोबर युवराजांनी आपल्या हातातील खलिता त्यांना दिला. तो वाचून चंडवर्म्याने चमत्कारिक नजरेने युवराज महाराजांकडे पाहिले. इतक्यात राजगुरूंनी दरबारात प्रवेश करताच चंडवर्म्याने तो खलिता त्यांच्या हाती दिला. त्यातील मजकूर वाचून राजगुरू स्तंभित झाले. त्यांनी प्रश्नार्थक मुद्रेने अभयसिंहाकडे पाहिले. त्याबरोबर युवराज म्हणाले,

'सुभेदार बलबीरसिंगांनी पाठविलेल्या ह्या देवदूतीची भेट घ्यावी असं मी ठरवलंय.'

'छे, छे, युवराज महाराजांनी असा अविचार करू नये. शिपाईगड्याचा वेष धारण करणारी ही स्त्री भयंकर असली पाहिजे.'

सरनोबत चंडवर्मा यांनीही राजगुरूंच्या सांगण्याला दुजोरा दिला. पण युवराजानी ठामपणे म्हणले,

'काय वाटेल ते झाले तरी मी तिची भेट घेणारच !'

इतक्या ठामपणे उच्चारलेले युवराजांचे ते शब्द ऐकून व त्यांच्या मुद्रेवरील भाव पाहून दोघेही आश्चर्यचकित झाले. सेनाधिकारी हंबीरराव पुढे येऊन म्हणाला,

'युवराज महाराजांचा आग्रह आपण मानावा. शिलेदार बनून

आलेली ही तरुण स्त्री विलक्षण आहे. तिला देवीचा साक्षात्कार झालेला आहे. तिला नकार देऊन आपण देवीचा कोप ओढवून घेऊ नये.'

त्याला दुजोरा देण्यासाठी पुढे येत त्याचा मित्र उदयसिंग म्हणाला, 'आपल्यापैकी कोणीच शत्रूचा भवानगडला पडलेला वेढा उठविण्याची हिंमत धरीत नाही. सरसेनापती वीरसिंहजी अनुकूल वाऱ्याची वाट पाहत नदीच्या अलीकडच्या तीरावर कैक दिवस तळ देऊन बसलेत. किल्ल्यातील आपली शिबंदी किती दिवस तग धरील हे सांगता येत नाही. भवानगड पडला तर आपली ही नवी राजधानीही शत्रूच्या हाती पडण्याचा धोका निर्माण होईल. अशा संकटप्रसंगी दुर्गादेवीनेच आपल्या मदतीला ही दूती पाठविली आहे. ती खात्रीपूर्वक सांगते की आपण हा शत्रूचा वेढा उठवून त्याला पार पिटाळून लावू. तर आपण तिला ही संधी का देऊ नये? युवराज महाराजांना प्रत्यक्ष भेटून ती आपला बेत त्यांना सांगणार आहे. तेव्हा त्यांनी तसे करण्यास आपण अनुमती द्यावी.'

राजगुरूंच्या मनावर ह्या दोघांच्या बोलण्याचा अनुकूल परिणाम झाला आणि त्यांनी पुन्हा एकदा तो खलिता लक्षपूर्वक वाचून पाहिला.

ही बोलणी लक्षपूर्वक ऐकत असणारे सरदार मानसिंह पुढे सरसावून म्हणाले, 'मी एक तोडगा सुचवतो.'

सरदार मानसिंहांना पित्याच्या मृत्यूनंतर नुकतीच सरदारकीची वस्त्रे मिळाली होती. ते युवराजांच्याच वयाचे असून त्यांची अंगलटही त्यांच्याचसारखी होती. राजगुरूंच्या विश्वासातले ते होते.

‘हं, बोला. सांगा तुमचा तोडगा–’ असं त्यांनी म्हणताच मानसिंह म्हणाले,

‘आत्ता दरबार सुरू होताच मीच युवराज महाराज आहे अशी बतावणी करतो. युवराज महाराजांनी मानकऱ्यांमध्ये माझ्या जागी बसावे. नंतर आपण ह्या बिजलीबाईंना दरबारात येण्याची आज्ञा द्यावी. त्यांनी जर युवराज महाराजांना ओळखून काढलं तरच तिच्यात काही दैवी शक्ती आहे असं सिद्ध होईल.’

मानसिंहाच्या ह्या बेताला सर्वांनी होकार भरला. राजमाता विलासिनीदेवी दरबारमहालात प्रवेशल्या. कालच्या जागरणानं



दरबार महाली पोचायला.त्यांना आज उशीर झाला होता त्या स्थानापन्न होताच चंडवर्म्याने त्यांच्या कानी सर्व हकीगत घालून त्यांनी आपली संमती द्यावी असा त्यांना सल्ला दिला. महाराणींची अनुज्ञा मिळताचा बिजलीकडे तातडीने दूत रवाना झाला.

थोड्याच वेळात प्रतिहारीनं ललकारी दिली. बिजलीनं संपूर्ण शिलेदारी पोषाख धारण केला होता आणि त्या रुबाबातच तिने दरबारात प्रवेश केला. समोरच्या मोठ्या सिंहासनासमोर मानसिंह युवराजांच्या भूमिकेत उभा होता. बाजूच्या सिंहासनावर राजमाता बसलेली होती. सौभाग्यालंकार वगळून बाकी सर्व थाटमाट तिने केलेला होता. तिच्या डाव्या हाताला उच्चासनावर सरनोबत चंडवर्मा ऐटीत बसलेला होता. मोठ्या सिंहासनाच्या उजव्या बाजूला उच्चासनावर राजगुरू व प्रधानजी बसलेले होते. सर्व मानकरी, सरदार-दरकदार आपापल्या जागी बसलेले होते व त्यांच्यातच युवराज महाराज मानसिंहाच्या जागी बसलेले होते. बिजली सिंहासनाजवळ जाताचा 'काय हा पोषाख !' असे राजमातेचे उद्गार तिच्या कानी पडले. चिकाच्या पड्या-आड बसलेल्या मानकरी स्त्रिया मोठ्याने हसल्या. मानसिंहाने त्या बाजूकडे दृष्टिक्षेप टाकून दरबाराचे रीतिरिवाज सांभाळ-ण्याची त्यांना तीव्र शब्दांत ताकीद दिली. 'लढाई करायची तर हाच पोषाख हवा !' असं खणखणीत शब्दांत उत्तर देऊन 'युवराज महाराज कुठे आहेत?' असा तिने प्रश्न केला. त्याबरोबर मानसिंह उत्तरला,

'तू युवराज महाराजांच्या समोरच उभी आहेस.'

तेव्हा ती हसून म्हणाली, 'सरदारसाहेब, कुणाला फसवता तुम्ही ?'

मानसिंहाला हसू आवरेना. तो खाली उतरला. बिजली एव्हाना मागे वळून मानकऱ्यांमध्ये शिरली होती. त्या घोळक्यात तिने युवराज अभयसिंहांना बरोबर ओळखले नि त्यांच्यापुढे वाकून ती म्हणाली,

'महाराजांनी सिंहासनावर बसावं.'

युवराज महाराज तिच्या मागोमाग मुकाट्याने निघाले आणि मोठ्या सिंहासनावर बसले.

बिजलीने त्यांना लवून मुजरा केला आणि म्हटले, 'युवराज महाराज, देवीची मला आज्ञा झाली आहे की, शत्रूला पिटाळून लावून देश निर्भय करावा आणि आपल्याला ह्या सिंहासनावर राजगुरूंच्याकडून विधिपूर्वक राज्याभिषेक करावा.'

हे शब्द ऐकताच अंगात स्फूर्ती संचरून उभा राहून उच्च स्वरात अभयसिंह म्हणाला,

'दरबारी लोकहो, ह्या देवदूतीने माझ्यातील राजतेज बरोबर ओळखले आहे. माझ्या सिंहासनावरील हक्काबद्दल ह्यापुढे कोणालाही जरासुद्धा शंका घेता येणार नाही.'

राजगुरूंच्या मनावरही बिजलीच्या दैवी तेजाचा प्रभाव पडला. बिजलीने नम्रपणे राजगुरूंना वंदन केले, तेव्हा राजगुरूंनी 'विजयी-भव' असा तिला आशीर्वाद दिला. चंडवर्मा मनातल्या मनात जळफळला आणि महाराणीच्या कानाशी लागला. पण महाराणीही अवाक होऊन शून्य नजरेने बघत राहिली.

बिजलीने युवराजांशी एकांतात बोलण्याची अनुज्ञा मागितली. राजगुरूंनी ती मान्य केली. मधल्या दोन घटकांच्या विश्रांतीची घोषणा करण्यात आल्याबरोबर थोड्याच वेळात दरबारमहाल

रिकामा झाला. युवराज व बिजली, दोघेच एकांतात बोलण्यासाठी थांबली.

'युवराज महाराज, अभयसिंह हे तुमचं नाव तुम्ही सार्थ केलं पाहिजे. थोरल्या महाराजांचा पराक्रम आठवा. त्यांनी तुम्हाला हे नाव किती अपेक्षेनं ठेवलेलं असेल ! शत्रूवर विजय मिळविण्याची जिद्द धरा, आणि त्याला आपल्या प्रिय मातृभूमीतून पार पिटाळून लावण्यासाठी युद्धाची जय्यत तयारी करा.'

त्यावर युवराज म्हणाला, 'मला युध्दाचा तिटकारा आहे. हत्या करणं माझ्या वृत्तीत बसत नाही. राजा होण्याची मला मुळीच इच्छा नाही. माझ्यावर हे सगळं लादलं गेलं आहे. कशाला पाहिजे हे सिंहासन ? माझ्या हातात काय आहे ? सगळेजण माझ्यावर हुकमत गाजवतात. मला त्यांची भीती वाटते.'

'तुम्हाला त्या चंडवर्म्याची भीती वाटते, होय ना ? टाकून द्या ती भीती. मी तुमच्यात धैर्य निर्माण करीन, तुम्हाला विजय मिळवून देण्यात मदत करीन. दुर्गादेवीनं मला तशी आज्ञा दिली आहे. तुम्हाला ह्या सिंहासनावर खराखुरा राजा म्हणून बसलेला पाहणं, तुम्हाला राजगुरूंकडून राज्याभिषेक करवणं हेच माझं जीवितकार्य आहे. ते देवीनं मला नेमून दिलं आहे. अभयसिंह महाराज, देवानं प्रत्येकाला ज्याचं त्याचं कर्तव्य नेमून दिलेलं आहे ते त्यानं पार पाडलंच पाहिजे. देश स्वतंत्र राखून प्रजेचा सांभाळ करणं व प्रजेला सुखी करण्याच्या बुध्दीनं राज्यकारभार करणं ह्यासाठीच तुमचा जन्म आहे. राजपद ताब्यात घेण्यात जर तुम्ही कुचराई केलीत तर भिकेशिवाय तुमच्या नशिबी काही नाही. स्वतःचं जीवित देवांच्या स्वाधीन करा म्हणजे तुमची भीती कुठच्याकुठे पळून जाईल. तुमच्यातला आत्मविश्वास जागा होईल.

दुर्गादेवीची आज्ञा आपण दोघांनीही शिरसावंद्य मानली पाहिजे.'

बिजलीच्या ह्या तेजस्वी बोलांनी युवराजाच्या अंगी स्फूर्ती संचरली. भारावून जाऊन त्यानं बिजलीला आश्वासन दिलं की, 'विश्रांतीनंतर आता दरबार भरेल त्यावेळी राज्याची सारी सूत्रं मी हाती घेतो. दरबार बरखास्त होईपर्यंत तू थांब आणि प्रत्यक्ष सर्व पाहा.'

विश्रांतीनंतर दरबार पुन्हा भरला त्यावेळी युवराजांमध्ये झालेला विलक्षण बदल सगळ्यांना लगेच जाणवला.

'आजपासून सैन्याचं अधिपत्य दुर्गादेवीची दूती बिजली हिच्या स्वाधीन मी करीत आहे–' अशी युवराजांनी घोषणा करताच, 'जय दुर्गादेवी!' म्हणत बिजली आपली तळपती तलवार म्यानातून उपसून आवेशाने ललकारली,

'अभयसिंह महाराजांचा विजय असो!' त्याबरोबर दरबारातील सरदार व सेनाधिकारी यांनीही आपापल्या तलवारी उंचावून तिला साथ दिली. त्या अभूतपूर्व गोष्टी घडत असता राजमाता जागच्या जागी थिजल्यासारखी झाली. चंडवर्मा पांढरा फटफटीत पडून आसनावरून खाली कोसळला. युवराज महाराज व बिजली ह्या दोघांनी अभिवादन करून राजगुरूंचा आशीर्वाद मागितला. 'विजयी भव!' ह्या राजगुरूंच्या आशीर्वादाने दोघांच्याही अंगी वीरश्रीचा नवसंचार झाला.

'प्रत्येक देशाला राजा, व तिथल्या प्रजेला त्यांची स्वतःची भाषा ह्या देवाने दिलेल्या गोष्टी आहेत. त्यांत ढवळाढवळ करणे म्हणजे देवाशी द्रोह करणे होय. आपली सत्ता दुसऱ्यावर लादणं, आपली भाषा दुसऱ्यावर लादणं हे पाप आहे. जो तो आपल्या भूमीचा पुत्र आहे. तो त्या ठिकाणी सुविहित असतो. तो दुसरीकडे

गेला की त्याच्या अंगी सैतान संचार करतो. आपल्या देशात घुसलेले हे परके आपले शत्रू होत. शत्रू प्रबळ आहे, त्याचे सैनिक जास्त शूर आहेत वगैरे गोष्टींची तमा बाळगू नका. परक्या शत्रूचा पराभव आपण सहज करू शकू अशी हिंमत बाळगा. परमेश्वर सत्याच्या पाठीशी असतो. त्याच्यावर श्रद्धा ठेवून, त्याच्या हाती स्वतःला सोपवून, प्रयत्नांची पराकाष्ठा करून मरेतो झुंजेन अशी आपण शपथ घेऊ या. आपला जय होणार हे निश्चित. दुर्गादेवी की जय !'

बिजलीचे हे दरबाराला उद्देशून केलेले भाषण म्हणजे साक्षात दुर्गादेवीची जणू आकाशवाणी! सर्वांचे अंतःकरण एका नव्या जाणिवेने व विलक्षण स्फूर्तीने भरून गेले.

★ ★

## ५

घोड्यांच्या टापांचे प्रतिध्वनी उठत होते. वातावरणात धुरळा मिसळत होता. झाडे वाऱ्याने सळसळत होती. टापांच्या आवाजाची चाहूल लागून सूर्यास्ताला झाडांच्या आसऱ्याला आलेली रान-पाखरं पंख फडफडवीत सैरावैरा उडत होती. माहीतगार वाटाडे बरोबर असल्यामुळे घोडेस्वार भरधाव चालले होते. जंगलं, खिंडी, दरडी–कशाचीही तमा न बाळगता घोडदौड चालू होती. पहाडांची एक रांग बाजूला होत गेली. गुलाबी संधिप्रकाशात समोर किल्ला दिसू लागला–भवानगड !

'चलो भवानगड !' ह्या बिजलीच्या दरबारातील घोषणेला उत्स्फूर्त साद मिळालेली होती. बिजली आपला मनसुबा प्रत्यक्षात आणण्याच्या तयारीला लगेच लागली. आपल्या तिरंदाज तुकडीला तिने तातडीने निरोप पाठविला. जिदा आणि भीमा यांच्यावर तिने आणखी एक महत्त्वाची कामगिरी सोपविली. ठिकठिका-णच्या तरुणांच्या तुकड्यांमध्ये एकसूत्रता आणून त्यांना ज्या वेळी ज्या ठिकाणी जाण्याचा निरोप मिळेल त्या वेळी त्या ठिकाणी

त्यांनी जय्यत तयारीनिशी हजर होण्याची व्यवस्था करावयाची होती.

महानदीच्या अलीकडच्या तीरावर तळ देऊन राहिलेल्या सर-सेनापती वीरसिंहांना युवराज महाराजांचा खास तातडीचा खलिता रवाना झाला. राज्यातील सर्व सेनेची सर्वाधिकारी म्हणून देवदूती बिजली हिची नेमणूक करण्यात आल्याची घोषणा ह्या खलित्यात असून सेनापती वीरसिंहांनी सर्वाधिकारी बिजली हिच्या सल्ल्याने मोहिमेची आखणी करावी असा त्यात हुकूम होता. किल्ल्यातील शिबंदीला ठरलेल्या बेताची कल्पना हेरांमार्फत लवकरात लवकर द्यावी असेही फर्मावण्यात आले होते.

भवानगड समोर दिसू लागताच दाट झाडीत शिरून पुढच्या हुकुमाची वाट पाहण्यास तिने सैनिकांना सांगितले. बरोबर दोन वाटाडे व शिलेदार सावंत यांना घेऊन ती त्वरेने पुढे निघाली. थोडयाच अवधीत वीरसिंहांचा तळ दिसू लागला. खलिता मिळाल्यापासून ही अलौकिक बिजली केव्हा दृष्टीस पडते म्हणून सरसेनापती वाट पाहत होता. त्याचे टेहळे तिच्या वाटेवर लक्ष ठेवून होते. वारा अनुकूल वाहू लागताच तावडतोब खबर मिळण्याचीही त्याने व्यवस्था केलेली होती. बिजलीच्या आगम-नाची खबर मिळताच तो दोन अधिकाऱ्यांसमवेत तिला सामोरा गेला. समोरासमोर येताच वीरसिंह व बिजली यांनी आपापल्या घोडयावरून खाली उडी घेतली. स्वागताचे शब्द पुरे होतात न होतात तोच एक दूत दौडत आला. 'वारा अनुकूल' वाहू लागल्याची खबर त्याने सरसेनापतींना दिली. ही वार्ता कानी पडताच सरसेनापती भारावून गेला. हा चमत्कार ह्या देवदूती-चाच अशी ग्वाही त्याला अन्तर्मनाने दिली. आणि बिजलीचे

सर्वाधिकारित्व त्याने भक्तिभावाने मानले.

सरसेनापतीच्या तंबूत पुढचा बेत नक्की करण्यात आला. लगोलग हल्ला करण्याचे ठरविण्यात आले. बिजली आपल्या तुकडीकडे येण्यासाठी दौडत निघाली. ज्या ठिकाणी झाडीत सैनिकांना थांबविण्यात आले होते तिथे चुडी पेटविण्यात येत होत्या. तिच्या निरोपाप्रमाणे तिरंदाज बहाद्दरांच्या दोन तुकड्या नुकत्याच येऊन थडकल्या होत्या. भिल्ल व गोंड यांच्या ह्या तुकड्यांचे नेतृत्व जिदा व भीमा यांच्याकडे होते. त्यांना पाहताच बिजलीच्या नेत्रांत आनंदाश्रू चमकले. त्यांना शाबासकी देऊन तिने त्यांच्या कामगिरीची सर्व माहिती घेतली. त्यानंतर त्यांना थोडी विश्रांती देऊन तिने आपल्या वडिलांच्या खुशालीची चौकशी केली.

इकडे वारा अनुकूल झाल्याने वीरसिंहाने आपल्या सैन्याचा तळ उठवून सज्ज ठेवलेल्या नावांतून सैनिकांना पैलतीरावर नेण्याचे कार्य त्वरेने पूर्ण केले. पाठोपाठ बिजली आपल्या सर्व तुकड्यांसह पैलतीराला गेली. हजारो स्वार किल्ल्याच्या रोखाने निघाले. बिजली आघाडीवर लगाम ताणीत होती. तिच्या खांद्याला खांदा लावून सेनापती दौडत होता. किल्ल्याच्या दरवाज्याच्या माथ्यावरच्या पहारेकऱ्यांनी आतील शिबंदीला ताबडतोब ही खूषखबर दिली. आतून नि बाहेरून मारा सुरू होताच वेढा देऊन बसलेले शत्रूचे सैन्य कोंडीत सापडले. नुकतीच त्यांनी तटाला चीर पाडली होती. हा दुहेरी हल्ला सुरू होताच शत्रुसैन्य चेवले. मोठमोठ्याने रणगर्जना करीत त्यांनी किल्ल्याला खिंडार पाडण्यासाठी आटापिटा चालविला. हां हां म्हणता भिताड

कोसळून किल्ल्याला खिंडार पडले. त्याबरोबर शत्रूची फौज खिंडाराकडे भरधाव सुटली. तोच प्रत्यक्ष रणदेवताच अशी बिजली, ‘ जय दुर्गे! जय भवानी ! ’ अशा गर्जना करीत शत्रूच्या पिछाडीवर तुटून पडली. ह्या तुफानी हल्ल्यामुळे शत्रू चिमटीत सापडला. बिजलीला प्रत्यक्ष दुर्गादेवीचा अवतार मानणाऱ्या सैनिकांनी तिच्या समशेरीच्या तेजाने प्रभावित होऊन चित्त्याच्या झडपेने शत्रूवर हल्ला करून त्याची दाणादाण उडवून दिली. चिमूटभर उरलेले सैनिक घेऊन शत्रूचा सेनापती पळत सुटला. किल्ल्यावर नगारे, चौघडे, शहाजणे, कर्णे वाजू लागले. शिंगांच्या ललकाऱ्या शिरारल्या. तोच डोंगराच्या माथ्यावर सूर्यबिंब झळकू लागले नि दशदिशा सोनेरी प्रकाशाने न्हाऊन निघाल्या. सूर्य-नारायणाला वंदन करून बिजलीने वीरसिंहासह किल्ल्याच्या प्रचंड दरवाज्यातून आत प्रवेश केला. जयजयकाराने आसमंत दुमदुमून गेला. जिकडे तिकडे आनंदी आनंद पसरला. पठारावर वारा झुळूझुळू वाहून सगळ्यांचा श्रमपरिहार करीत होता. कळकांच्या बेटात घुसून तो मजेदार सूर काढीत ह्या आनंदोत्सवात सहभागी झाला होता. पानांनी भरून गेलेल्या पिंपळाच्या फांद्या त्याच्या तालावर झुलत आपल्या आवाजाच्या लाटांनी त्याला साथ करीत होत्या. पलीकडच्या डोंगरदरीतून चकाकणारा ओहोळ अंगचोरपणाने वाट काढीत झाडीत अदृश्य झाला होता. जवळच कुठेतरी महानदीच्या प्रवाहात विलीन होऊन तो तिचे पात्र आणखी फुगवणार होता. पाठीमागच्या बाजूला उभे असलेले छोटे छोटे डोंगर म्हणजे भवानगडचे जणू टेहळेच भासत होते. भवानगडच्या विजयाची वार्ता लगोलग विलासपूरमध्ये पोचली. युवराज अभयसिंह तातडीने किल्ल्याकडे

निघाला. त्याच्या समवेत सरदार मानसिंहही होता. बिजलीच्या समवेत मोहिमेवर निघण्याचा त्या दोघांचा बेत होता. पण बिजलीने त्यांना थोपवून धरले होते. निघताना तिने आश्वासन दिले होते,

'योग्य वेळी आपल्याला निरोप धाडते. किल्ल्याची मोहीम फत्ते होणारच. आपण निःशंक असावे, किल्ल्यावर विजयीध्वज आपल्या हातानेच फडकविण्यात येईल.'

युवराज महाराजांचे अभूतपूर्व स्वागत करण्यात आले. सर्व किल्ल्याभर पताका फडकत होत्या. सर्वांच्या उत्साहाला उधाण आले होते. किल्ल्यावर मोठा समारंभ करण्यात येऊन पराक्रमी वीरांना बक्षिसे देण्यात आली. शिलेदार सावंत, हंबीरराव आणि जिंदा ह्यांचा विशेष गौरव करण्यात आला. बिजलीची स्तुति-स्तोत्रं गाण्यात सर्वांना धन्यता वाटत होती.

शाहिराची कवने डफतुणतुण्यांच्या निनादात आसमंत दणाणून सोडीत होती. सभेतील श्रोत्यांनी पुढील कवनाला उत्स्फूर्त साथ दिली—

दुर्ग जिंकुनी आम्ही
विजयी वीर फाकडे
बिजलिदेवि संगती
चाललो पुढे पुढे ॥ ध्रु. ॥
दैन्य आज संपले
शत्रुसैन्य नमविले
असाध्य तेही साधिले

दुर्लंघ्य लंघुनी कडे ॥ १ ॥
बिजलिदेवि शोभली
खड्ग हाति घेउनी
असुर महिषमर्दिनी
तिजसि जगत तोकडे ॥ २ ॥
आपण जाउ या पुढे
विजलिदेवि संगती
जाउ या पुढे पुढे ॥

★ ★

## ६

भवानगडची मोहीम ज्या तडफेने बिजलीने पूर्णपणे यशस्वी केली होती ती पाहून राज्यातील जनता बिजलीची भक्त बनली. गेल्या आठ वर्षांत शत्रूशी मुकाबला करताना शिलेदार, सेनाधिकारी, सरदार नि खुद्द सरनोबत चंडवर्मा स्वतःचा प्राण बचावण्याकडे लक्ष ठेवून लढत असत. शत्रूवर विजय मिळविण्याची जिद्द कोणातच नव्हती. तात्पुरते तह करून प्रत्येकजण स्वतःला जहागीर, संपत्ती मिळविण्याच्या खटपटीत असे. आपल्या अशा वागण्याने राज्य हळूहळू दुर्बल होत चालले आहे ह्याबद्दल कोणालाच चिंता नव्हती. महाराणी विलासिनी सर्वस्वी चंडवर्म्यावर विसंबून असे. युवराज महाराजांना कोणी मानीत नसे नि त्यांना तर लढाई नापसंत असे.

प्राणपणाने लढून शत्रूवर विजय मिळविण्याची जिद्द बिजलीने प्रथमच निर्माण केली होती. शत्रूवर तडफेने एकदम जोरदार हल्ला करून त्याला चकित करणे हे तिच्या युद्धतंत्रातले महत्त्वाचे अंग. तिरंदाजांचा अचूक मारा हे दुसरे. त्यासाठीच तिने जिंदा व

भीमा यांच्या मदतीने गोंड व भिल्ल यांची तिरकमठा पथके तयार केली होती. त्यांची तिच्यावर विलक्षण निष्ठा होती. स्वतःचे प्राण परमेश्वराच्या स्वाधीन करून जिवावर उदार होऊन आपल्या तळपत्या तरवारीने आघाडीवर ती असा अभूतपूर्व पराक्रम गाजवी की, ही प्रत्यक्ष दुर्गादेवीच त्यांना अभय देण्यासाठी अवतरली आहे. असा सैनिकांना भास होई आणि अशा भारलेल्या अवस्थेत सामान्य माणसेही अतुलनीय शौर्य दाखवीत. तिची तेजस्विता अनुभवून शिलेदार सावंत व हंबीररावांसारखे सेनाधिकारीच नव्हे तर स्वतः सेनापती वीरसिंह तिचे एकनिष्ठ अनुयायी बनले होते. युवराज महाराजांवरही तिचा एवढा प्रभाव पडला होता की तिच्या योजनांना सर्वतोपरी ते पाठिंबा देत. त्यांचा भित्रेपणा, कमकुवतपणा ह्या गोष्टी पार नाहीशा झाल्या होत्या.

शत्रूने बळकावलेल्या किल्ल्यांपैकी लोहगड परत घेण्याच्या मोहिमेत बिजलीबरोबर स्वतः अभयसिंह युवराज होते. बिजलीच्या पराक्रमाने भारले जाऊन तेही मोठ्या शौर्याने लढले. शत्रू दाती तृण धरून शरण आला. किल्ल्याचा कबजा घेऊन किल्ल्यावर स्वहस्ते अभयसिंहाने आपला ध्वज फडकविला. पण ह्या अटीतटीच्या मोहिमेत उभय बाजूंच्या सैन्याची खूपच प्राणहानी झाली होती. शत्रूने किल्ला सोडण्यापूर्वी पुष्कळ नासधूस केली होती. कित्येक वृक्ष तोडून आग लावण्यासाठी त्यांचा वापर करण्यात आलेला होता. ठायीठायी जळक्या लाकडांचे ओंडके, अर्धवट जळलेल्या इमारती, राखेचे नि दगडविटांचे ढिगारे मार्गात आडवे येत होते. एक महाल तेवढा शाबूत होता. महालाच्या पलीकडे एक मोठी विहीर होती. त्या विहिरीवर छत्र धरून उभं असलेलं

एक पळसाचं झाड लक्ष वेधून घेत होतं. मोठ्या मोठ्या लाल फुलांनी हा वृक्ष बहरून गेला होता. पण त्या लाल फुलांच्या दर्शनानं युवराजांच्या डोळ्यांपुढे किल्ला सर करण्यासाठी झालेला रक्तपात जणू साकार झाला. ते एकदम खिन्न झाले. विश्रांती घेण्यासाठी महालात सर्व सुखसोयींची व्यवस्था करण्यात आलेली होती. पण युवराज बेचैन झालेले होते. किल्ल्याची डागडुजी करण्यासंबंधी व इतर महत्त्वाची कामे तातडीने उरकून त्यांनी विलासपूरची वाट धरली.

ह्यापुढच्या मोहिमांमध्ये युवराज महाराज सामील झाले नाहीत. बिजलीने एकापाठोपाठ एक किल्ले घेण्याचा सपाटा लावला. सेनापती वीरसिंह आणि हंबीरराव हे दोघे मात्र एक-निष्ठपणे बिजलीच्या पाठीशी उभे होते. गजेन्द्रगड, अजिक्यगड आणि देवगड हे किल्ले आणि त्यांच्या सभोवतालचा सर्व प्रदेश शत्रूच्या जोखडातून मुक्त झाले. आता फक्त विशालदुर्ग आणि रायपूर ही दोनच ठाणी उरली होती.

पण आता वर्षाऋतूने भयंकर उग्र स्वरूप धारण केले. सोसा-ट्याचा वारा आणि मुसळधार पाऊस. नदीनाले दुथडी भरून वाहू लागले. महानदी सागराप्रमाणे गर्जना करीत वाहत होती. तिच्या पात्रात उसळणाऱ्या लाटा आणि त्यांवरचा फेस यांच्यामुळे पलीकडचा किनारा दिसणेही अशक्य झाले होते. त्यामुळे आता विश्रांती घेणे भाग होते. पावसाळा संपेपर्यंत सैनिकांना रजा देऊन घरी पाठविण्यात आले. मात्र आज्ञा मिळताच परत आपल्या जागी त्यांनी रुजू झाले पाहिजे असे त्यांना बजावण्यात आले.

विलासपूरच्या राजवाड्यातच अभयसिंह महाराजांना राज्या-भिषेक करण्याचा समारंभ लवकरात लवकर घडवून आणावा असे

बिजलीच्या मनाने घेतले. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने हा समारंभ अवश्य आहे हा राजगुरूंचा कधीचा आग्रह होता. आतापर्यंत राजमाता विलासिनी आणि सरनोबत चंडवर्मा यांनी काही ना काही सबबीवर तो समारंभ सतत लांबणीवर टाकला होता. पण आता राजगुरूंना बिजलीची साथ मिळाली. शत्रूला जरब बसण्याच्या दृष्टीनेही राज्याभिषेक समारंभ आवश्यक होता. त्या दृष्टीने तयारीला सुरुवात झाली. पावसाचा जोर कमी होताच अश्विन महिन्यातला मुहूर्त साधावयाचा असे ठरले.

अभयसिंह महाराज राज्यकारभाराची सूत्रे प्रभावीपणे चालवीत होते. जिंकलेल्या किल्ल्यांचा व मुलखाचा बंदोबस्त व्यवस्थित झाला होता. प्रधानजींच्या सल्ल्याला पुन्हा पूर्वीसारखा मान मिळू लागला होता. राजगुरू राज्याभिषेकाच्या दृष्टीने तयारीला लागलेले होते.

बिजलीला विश्रांतीचा हा काळ विलासपुरात घालविणे पसंत नव्हते. घरी शिवनीला आपल्या बाबांच्यासंगं हा काळ घालवावा असं तिनं ठरवलं. जिंदा, भीमा आपापल्या तुकड्यांना घेऊन तिकडे रवाना झालेच होते. शिलेदार सावंत आणि हंबीरराव त्याच भागात जाणार होते. तेव्हा त्यांच्याचबरोबर बिजली शिवनीला जाण्यासाठी निघाली. गुलछडीवर बिजलीने खोगीर चढवले तेव्हाच तिने ओळखले की घरी जायचंय. ती आता आपल्या मालकिणीला अधिकच प्यार झालेली होती. तिने बिजलीला सर्व मोहिमांमध्ये जिवलग मैत्रिणीची साथ दिली होती. दोघी घरच्या ओढीने चालल्या होत्या. वाटेत महानदी पार करायची होती. बिजलीने आपली घोडी नदीच्या पात्रात सर्वांत पुढे फेकली. पाठोपाठ हंबीरराव व सावंत यांनी तिचे अनुकरण केले. सर्वजण प्रवाह

कापीत निघाले. प्रवाहावर फेसच फेस दिसत होता. लाटांच्या एका समूहातून ते पुढे जातात तो दुसरा समूह हजर. घोडे जोर-जोराने फुरफुरत होते. स्वारांनी आपले पाय घोड्यावर घट्ट आवळले होते. पाण्याचे तुषार वर उसळून शरीरावर तडातड आपटत होते. पण एकाच्याही मनात भीतीचा अंशदेखील नव्हता. अशाही परिस्थितीत घरी जाण्याची अनावर ओढ होती. आणि हां हां म्हणता तिन्ही स्वारांनी नदी पार केली.

पाण्याने निथळत ते पलीकडच्या तीरावर उतरले तेव्हा त्यांना हुडहुडी भरली. घोड्यांचीही अंगं थरथरत होती. सुदैवानं आकाश स्वच्छ होतं. सूर्यकिरणांनी त्यांना हवी असलेली ऊब दिली. घोड्यांना चुचकारून, थोपटून उरलेला मार्ग आक्रमण्यास त्यांनी सुरुवात केली. थोड्याच अंतरावर त्यांना जिदा व भीमा भेटले. मग शिलेदार सावंत आणि हंबीरराव बिजलीचा निरोप घेऊन आपापल्या गावच्या मार्गाकडे वळले. जिदा पुढे झाला नि त्याने बजाबाला निरोप सांगितला.

बापलेकीची ती भेट जिदा– भीमाने डोळे भरून पाहिली. बजाबाला आपल्या लेकीला कुठं ठेवू नि कुठं नको असं झालं. आसमंतातले बिजलीचे भक्त गोळा झाले. चार दिवस आनंदोत्सव चालू होते.

ह्या आनंदोत्सव प्रसंगी सरोवरातील कमलपत्राप्रमाणे बिजली अलिप्त होती. तिच्याकडे कौतुकाच्या नजरेने पाहत असता बजाबाच्या मन:चक्षूपुढे तिच्या जन्मापासूनच्या गोष्टी येत होत्या. दुर्गादेवीच्या कृपाप्रसादानंच बिजलीचा जन्म झाला अशी तिच्या आईची मनोमन खात्री होती. बजाबाची बायको गौरीबाई हिनं दुर्गादेवीचं व्रत केलं होतं. दिसायला ती गौरीसारखीच सुंदर होती.

प्रकृतीनंही ती सुदृढ होती. पण दुर्दैवानं तिची तीन बाळंतपणं फार कष्टाची झाली होती. नि प्रत्येक खेपेला मूल दगावलं होतं. तेव्हा तिनं दुर्गादेवीला साकडं घातलं होतं. तिला आळवण्यासाठी तिने कठीण असे व्रत आरंभिले. आणि देवीच्या कृपेने तिचे शेवटचे बाळंतपण निर्वेधपणे झाले.

गुटगुटीत, बाळसेदार असं मुलीचं तजेलदार रूप पाहून सर्वांना फार आनंद झाला. मुलगी झाली, मुलगा नाही, ह्याचा यत्किंचितही विषाद बजाबाला नि गौराईला झाला नाही. तिचे तेजस्वी डोळे नि अंगकांती पाहून तिला सर्वजण 'बिजली' म्हणत. तिचे पाळण्यातले दुर्गा हे नाव बाजूला पडून बिजली हेच नाव सर्वांच्या तोंडी झाले. आईचे दूध आणि लालनपालन तिला पाच वर्षेपर्यंत लाभले. बिजली मुलासारखीच वाढत होती. तिचे सगळे खेळ दांडगाईचे असत. बापाबरोबर ती उन्हातान्हातून शेतावरही वागडे. बिजली आठ वर्षांची झाली तोच एकाएकी गौराई आजारी पडली नि त्या दुखण्यातच तिचा अंत झाला. मृत्यू जवळ आला आहे ह्याची तिला जाणीव होताच तिने नवऱ्याला जवळ बोलावले. तिचे शेवटचे शब्द अगदी स्पष्ट येत होते,

'हे पाहा, जाताना एकच मागणं मागते. माझ्याइतकाच तुमचा पोरीवर जीव आहे. तरी राहवत नाही म्हणून सांगते. बिजली दुर्गादेवीची आहे. तिच्यावर कसलाही अधिकार गाजवू नका. देवी तिचं सगळं भलं करील. तिनंच तिला जन्माला घातलीय, वाढवलीय. तीच तिला हाताला धरून वागवतेय. बिजलीला दुःख वाटेल असं काही करू नका. येते मी. बिजे, दुर्गे...'

बिजली जवळ येताच तिच्याकडे तिने पाहिले डोळे भरून पाहिले. तिला जवळ घेतले. तिच्या तोंडावरून ती हात फिरवीत

असताच तो एकदम ढिला होऊन खाली पडला. बजाबाने मनोमन तिला वचन देऊन तिला मांडी दिली. गंगोदक मुखी जाताच्र गौराईने शेवटचा श्वास सोडला. आपल्या प्रिय पत्नीला दिलेला अखेरचा शब्द बजाबाने आजपर्यंत अक्षरशः पाळला होता.

घरी येऊन पुरता आठवडाही झाला नसेल तोच बिजलीने जिंदा साणि भीमा यांना सांगावा धाडून सगळचा तिरकमठे-बहाद्दरांना एकत्र करून अजून आपले कार्य पूर्ण झाले नसल्याची त्यांना जाणीव दिली. अधूनमधून त्यांचा सराव चालू ठेवण्याची कामगिरी तिने भिमावर सोपविली, आणि जिंदाला निवडक दहाबारा तिरंदाजांसह तिने विलासपूरला पाठविले. तेथे गेल्या-बरोबर सरसेनापती, राजगुरू आणि प्रधानजी यांची त्यांनी भेट घेऊन आपण आल्याची वर्दी द्यावी आणि नंतर युवराज महा-राजांच्या खास दिमतीला असावे असे त्यांना सांगितलेले होते. तसेच मधून मधून, निदान दर आठवड्याला, आपल्याकडे जासूद पाठवून विलासपुरातील हालहवाल कळवावी असे तिने जिंदाला बजावले होते.

जिंदाकडून पहिलाच जासूद आला तो अशी वार्ता घेऊन की, युवराज महाराज मानसिंहासह राजनांदगावला गेले आहेत. ह्या-पेक्षाही दुसरी वार्ता जास्तच अस्वस्थ करणारी होती. राजमाता आणि सरनोबत चंडवर्मा ह्यांची गुप्त खलबतं चालू असतात, नि त्यामुळेच राजगुरू आणि प्रधानजी चिंतातुर झालेले दिसतात. तेव्हा बिजलीने आणखी माणसे विलासपूरला पाठविली आणि दररोज विलासपूरहून दूत येण्याची व्यवस्था केली.

★ ★

# ७

'महाराणी विलासिनीताईंनी निश्चित असावं. सगळा बनाव कसा व्यवस्थित घडवून आणतो ते पाहावंच!' चंडवर्मा प्रौढीने सांगत होता.

'पण मला फार धाकधुक वाटतेय, दादा!' राजमाता विलासिनी म्हणत होती.

राजवाड्यातल्या अन्तर्भागातील आपल्या अन्तःपुरात महाराणीनं आपल्या बंधुराजांना बोलावून घेतलं होतं. तिथंच त्यांची रोज खलबतं चालली होती.

बिजलीला सैन्याचा सर्वाधिकार मिळाल्यापासून चंडवर्मा निष्प्रभ झाला होता. आतून तो अपमानाने जळत होता. आपले बेत जागच्या जागी राहिले असं वारंवार मनात येऊन बिजली व युवराज ह्या दोघांवरही सूड घेण्याचा त्याने चंग बांधला. शत्रूशी त्याचे संबंध होतेच. त्याचा मित्र विचित्रसेन शत्रूला जाऊन मिळालेला होताच. त्याच्या मदतीने ह्या दोघांवर सूड घेण्याचे कारस्थान तो रचीत होता. विलासिनी महाराणी आपल्याला पूर्वी-

सारखा अधिकार गाजविता येत नाही ह्या विचाराने असंतुष्ट झालेली होती. युवराज अभयसिंह राजमाता म्हणून तिचा मान ठेवीत असला तरी राज्यकारभाराची सर्व सूत्रे त्याने आपल्या हाती घेतलेली होती. तो राजगुरू नि विशेषत: प्रधानजी यांच्या सल्ल्यानेच राज्यकारभार करीत होता.

बिजली आपल्या गावाकडे गेल्यानंतर युवराज महाराजही राजनांदगावला गेले. मानसिंहही त्यांच्या पाठोपाठ तेथे गेला. विलासपुरातल्याप्रमाणेच राजनांदगावलाही त्याने राजवाड्याच्या जवळच आपला वाडा बांधून घेतला होता. त्या दोघांना एक-मेकांवाचून चैन पडत नसे. विलासपुरांत आता फक्त प्रधानजी आणि राजगुरू होते. ही संधी साधून चंडवर्म्याने आपली भगिनी विलासिनी महाराणी हिला आपल्या कारस्थानात ओढण्याचा प्रयत्न चालविला होता. धार्मिक कृत्ये करण्याच्या निमित्ताने राजगुरूंचा राजवाड्यात बराच वेळ मुक्काम असेच. तसेच प्रधानजीही राजवाड्यावरच दप्तरमहालात व सदरेवर असत. त्या दोघांचीही युवराज महाराजांवर अढळ निष्ठा होती आणि त्यामुळे त्यांचे चंडवर्मा व महाराणी यांच्या हालचालींवर बारीक लक्ष असे. म्हणूनच महाराणींच्या अंत:पुरात चंडवर्म्याची कारस्थानासंबंधीची बोलणी अगदी हलक्या आवाजात चालत.

महाराणींना वाटणारी भीती निरर्थक आहे असं सांगून चंडवर्मा पुढे म्हणाला, ' अभयसिंह आणि त्याची ती सिंहीण ह्या दोघांचाही एकाच बनावात परस्पर काटा काढला जाणार आहे. पण राज-मातेनं मला निश्चित वचन द्यायला हवं आहे. अभयसिंहाचा निकाल लागताच माझा पुत्र दिलीपसिंग याचं आपल्या मांडीवर दत्तकविधान झालं पाहिजे. '

' पण, दादा, दत्तकविधानाची एवढी घाई कशाला ? नि त्यासाठी माझं वचन कशापायी ? '

' घाई कशाला ? महाराणीताई, खरं म्हणजे फार उशीर झालेला आहे. मागेच मी म्हणत होतो त्याच वेळी जर आपण दिलीपसिंगाला दत्तक घेतलं असतं तर... '

' तर काय झालं असतं ?'

' तर पुढच्या सगळ्याच गोष्टी किती वेगळ्या झाल्या असत्या! त्या काळात अभयसिंह वर मान करून माझ्याशी बोलायलाही भीत होता. नावालाच फक्त अभयसिंह होता तो. आता त्या बयेनं, त्या हडळीनं केवढा अनर्थ घडवून आणलाय. लोक तिला सिंहीण म्हणतात. हंः ! म्हणे त्या सिंहिणीनं अभयसिंहाला खराखुरा सिंह बनवलाय !'

' पण सरनोबत महाराज, आपण तर ग्वाही देता ना की, त्या दोघांचाही ह्या बनावात आपण काटा काढणार?'

' अर्थात, अर्थात ! आणि म्हणूनच पुढच्या गोष्टींची मला आधीच खात्री करून घ्यायचीय. दिलीपसिंगाला नुकतीच अठरा वर्षं पूर्ण झालीयत. दत्तकविधान आटोपताच त्याचा राज्याभिषेक समारंभही लगेच पार पाडता येईल. तुमचे राजगुरू केशवभट्ट राज्याभिषेकाच्या तयारीत आहेतच. फक्त तो राज्याभिषेक कोणाला एवढंच आपण ठरवणार आहोत. करा म्हणावं, जय्यत तयारी करा ' असं उपरोधानं म्हणून चंडवर्म्यानं महाराणींना आपण आखलेला बेत सविस्तर समजावून दिला. आणि शेवटी सांगितलं.

' पण हा बनाव सुरळीत पार पाडण्यासाठी सुरुवातीची जबाबदारी आपण स्वीकारायची आहे. विशालदुर्गाचे अधिपती

विचित्रसेन यांची कन्या महाश्वेता ही अत्यंत रूपवती असून युवराज महाराजांसाठीच जणू विधात्याने तिला जन्माला घातली आहे असे तिच्या रूपगुणांचे वर्णन करून युवराज महाराजांचे मन वळविणे हे आपल्या हाती आहे. ही सोयरीक जुळविण्याची विचित्रसेन यांची फारा दिवसांची मनीषा आहे. मध्यंतरीची शत्रूला फितूर होण्याची घटना ही त्यांच्या साडेसातीतील दुर्दैवी घटना, तीबद्दल त्यांना कधीचा पश्चात्ताप होत असून ते प्रायश्चित्त घेण्यासाठी उत्सुक आहेत आणि त्यासाठीच ते विशालदुर्ग आपण-हून युवराज महाराजांच्या स्वाधीन करून त्यांची क्षमायाचना करू इच्छितात. अशा प्रकारे हा आपला महत्त्वाचा विशालदुर्ग सहजा-सहजी आपल्या ताब्यांत येत आहे नि आपले एक प्रमुख सरदार आपल्याकडे येऊन आपले राज्य बळकट होणार आहे. विचित्र-सेनांचे आपण जावई झाल्यावर आपले सामर्थ्य केवढे वाढणार आहे ! ह्या गोष्टी आपण युवराजांना पटवून द्या आणि किल्ल्याचा ताबा घेण्यासाठी जातीने तिकडे जाण्यासाठी त्यांना तयार करा.'

'त्याबद्दल तुम्ही निश्चित असा दादा, ते माझ्याकडं लागलं. बाकीचा सगळा व्यूह नीट रचा म्हणजे झालं.'

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे राजमातेकडून राजनांदगावला दूत रवाना झाले. दूतांनी युवराज महाराजांना तातडीचा निरोप सांगितला. युवराज महाराज विलासपूरला जाण्यासाठी निघण्या-पूर्वी मानसिहाने त्यांची एकांतात गाठ घेतली. त्यावेळी असे ठरले की, पुढचा कोणताही बेत अंमलात आणण्यापूर्वी युवराज महा-राजांनी राजनांदगावला येऊन मानसिहाशी सल्लामसलत करावी.

विलासपूरला राजमातेच्या अंतःपुरात युवराज महाराजांची खास व्यवस्था करण्यात आली होती. अभयसिहाला विलासिनी

महाराणींचे एक नवे स्वरूप पाहायला मिळत होते. त्यांच्या वाणीत एवढा गोडवा असेल अशी त्यांना आजपर्यंत कल्पना नव्हती. महाराणींबरोबर होत असणारी बोलणी खलबतखान्यात राजगुरू आणि प्रधानजी यांना समजत होती. सावलीप्रमाणे युवराजांच्या पाठीशी राहून जिंदा आपली कामगिरी चोखपणे बजावीत होता. युवराज महाराजांचे संरक्षण आणि बिजलीला वेळोवेळी खबर पाठविणे ह्या दोन्ही गोष्टी तो जिवाची बाजी लावून करीत होता.

विशालदुर्गाचा ताबा घेण्यासाठी लवकरच निघण्याचे आश्वासन देऊन युवराज महाराज राजनांदगावला परत गेले. मानसिंह वाटच पाहत होता. त्याला राजगुरू आणि प्रधानजींचे दूत वारंवार भेटत होतेच. राजनांदगावच्या राजवाड्यात पुढचे बेत पक्के करण्यात आले.

★ ★

# ८

महाराणी विलासिनी खूपच अस्वस्थ झाली होती. तिच्या अंत:पुरात चंडवर्मा आणि त्याचे दोन साथीदार यांच्याबरोबर गुप्त बोलणी चाललेली होती. विशालदुर्गाचा अधिपती विचित्रसेन ह्याच्याकडून जो निरोप आलेला होता त्यावर विचार चालू होता. निरोप असा आला होता– 'युवराज महाराजांच्या केसालाही धक्का न लावता त्यांना सन्मानाने विलासपूरला परत पाठविण्यास विचित्रसेन दुर्गाधिपती तयार होता. अट एकच होती. बिजलीला दुर्गाधिपतींच्या स्वाधीन करणे.'

चंडवर्मा म्हणत होता, 'विचित्रसेनांचे बिजलीबद्दलचे निदान अगदी बरोबर आहे. ती निश्चितपणे चेटकीण आहे. तिने आजपर्यंत मिळविलेले विजय हे चेटूक करून, जादूटोणा करून मिळविलेले आहेत. भिल्ल आणि गोंड यांना तिने उगीच नाही हाताशी धरले! त्यांच्याचकडून तिने ही अघोरी विद्या घेतलेली आहे. विलासपूरला तिच्याकडून धोका आहे इतकेच नव्हे तर

आपल्या सगळ्या राज्यालाच तिच्याकडून आणि तिच्या त्या भिल्ल, गोंड ह्या रानटी लोकांकडून धोका आहे. परस्पर विचित्रसेनांकडून तिचा नायनाट होईल नि आपला मार्ग मोकळा होईल.'

'पण अभयसिंहाचे काय?' विलासिनी राणीसाहेबांनी चंडवर्म्याकडे पाहत विचारले.

'त्याच्याबद्दल राणीसाहेबांनी निश्चित असावं. ते तर आधीच पक्कं ठरलेलं आहे. अभयसिंह विचित्रसेनांच्या ताब्यात जन्मभर कैदेतच खितपत पडणार.'

'पण त्या बिजलीला, त्या चेटकिणीला आपण विचित्रसेनाच्या स्वाधीन कसे करणार? आधी ती आपल्या हाती लागायला नको?' चंडवर्म्याच्या एका साथीदाराने शंका काढली.

त्यावर दुसरा चंडवर्म्याकडे नजर लावून म्हणाला, 'सरनोबत महाराजांनी ती सर्व व्यवस्था आधीच करून ठेवलेली आहे.'

'होय, तिला पकडून इकडे आणीत असल्याबद्दलच्या खबरीची मी वाटच पाहतोय.' चंडवर्मा म्हणाला.

अखेरीस आपल्या बेताला राजमातेची मान्यता मिळवून चंडवर्मा आपल्या सहकाऱ्यांसह आपल्या महालात गेला.

त्याच वेळी बिजलीचे वीर विशालदुर्गाच्या दरवाज्याला धडका देत होते. विलासपूर आणि राजनांदगाव ह्या दोन्ही ठिकाणांहून येणाऱ्या पुढच्या बातम्यांमुळे बिजलीने नेहमीच्या तडफेने आपल्या मोहिमेची तयारी केली. तिच्या भिल्ल-गोंडांच्या तुकड्या तर तयारच होत्या. शिलेदार सावंत व हंबीरराव यांना तातडीचे निरोप गेले. राजगुरू आणि प्रधानजी यांच्या सल्ल्याप्रमाणे सरसेनापती वीरसिंह गुप्तपणे आपल्या सैन्याच्या हालचाली करीत होता.

विशालदुर्गाला सर्व बाजूंनी वेढा घालण्यात आला. बिजलीच्या धनुर्धारांनी बाणांचा अचूक मारा करून दुर्गाच्या तटावरील सर्व पहारेकऱ्यांना लोळविले तेव्हा कुठे दुर्गाधिपतींना हल्ल्याची वार्ता समजली. मग दुर्गावर एकच हलकल्लोळ माजला. बिजलीची समशेर विजेप्रमाणे तळपत होती. शत्रुसैनिक भयभीत होऊन सैरा-वैरा धावत होते. सरसेनापतीने आपल्या तुकडीला दुसऱ्या दरवाजाने किल्ल्यात घुसवले. पळपुटे शत्रुसैनिक मेंढराप्रमाणे कापले जात होते. दुर्गाधिपतींना किल्ला लढविणे अशक्य झाले. त्यांनी बिनशर्त शरणागती पत्करली.



युवराजांना मोकळे करून त्यांच्या जागी दुर्गाधिपती विचित्र-

सेन यांना डांबण्यात आले. युवराजांना सामोरी जाणारी बिजली एकदम थबकली. 'सरदार मानसिंहजी, किती वेळा आपण युवराज महाराजांची बतावणी करणार आहात ?' हे बिजलीचे शब्द कानी पडताच मानसिंहाला हसू आवरेना. सरसेनापती वीरसिंहही थक्क झाला. विचित्रसेनाकडून किल्ल्याचा ताबा घेण्यासाठी युवराज महाराजांनी स्वतः जाण्यात केवढा धोका होता ! हा धोका जाणूनच राजगुरू, प्रधानजी व मानसिंह यांनी हा व्यूह रचला होता.

विशालदुर्गाची वार्ता कानी येताच चंडवर्मा खूप चडफडला. त्याचे साथीदार केव्हाच गडप झाले होते. विलासिनी महाराणींना तोंड दाखविण्याचीही त्याला हिंमत राहिली नाही. पळून जाण्याशिवाय त्याला मार्ग उरला नाही. पण हा मार्ग स्वतः युवराज महाराजांनीच रोखून धरला. चंडवर्म्याच्या मुसक्या बांधण्यात येऊन त्याची अंधारकोठडीत रवानगी करण्यात आली. युवराज महाराजांनी विलासिनी राजमातेच्या महालात प्रवेश केला तेव्हा 'महाराणीसाहेब आपल्या शय्येवरून उठू शकत नाहीत' असा दासींनी निरोप सांगितला. महाराणींचा चेहरा पांढरा फटफटीत झाला होता नि त्या बोलण्याच्या अवस्थेत नव्हत्या. युवराज महाराजांनी 'आपणाला भिण्याचे कारण नाही !' असे त्यांना सांगून त्यांच्या महालाभोवती कडक पहारा बसविला.

विशालदुर्गाची मोहीम यशस्वी करण्यात बिजलीला सरसेनापतींप्रमाणे हंबीररावांची फार मोलाची मदत झाली होती. ह्या मोहिमेत फारच थोडी माणसे धारातीर्थी पडली होती. किल्ला तर जसाच्या तसा शाबूत होता. सरसेनापतींच्या सल्ल्याने बिजलीने हंबीररावांना किल्लेदार म्हणून तात्पुरते नेमले. दुर्गाधिपती विचित्रसेन यांना जेरबंद करून विलासपूरला नेण्यात आले.

युवराज महाराजांची भेट होताच बिजलीने त्यांना रायपूर घेण्यासाठी शेवटची मोहीम लवकरच हाती घ्यावी असे सुचविले. युवराज महाराजांनी तिला सबुरीचा सल्ला दिला.

लवकरच न्यायासनासमोर सरनोबत चंडवर्मा यांना उभे करण्यात आले. विशालदुर्गाचा अधिपती विचित्रसेन याची अत्यंत महत्त्वाची साक्ष झाली. चंडवर्म्यावर राजद्रोहाचा आरोप शाबीत झाला. त्याने आजपर्यंत राज्याशीही द्रोह करून जनतेला नाना प्रकारांनी सतावले होते. त्याची गय करण्याचे काहीच कारण नव्हते. राजमातेचे ते बंधू असूनही त्यांनी योग्य सल्ला कधीच दिला नाही. उलट बदसल्ला देऊन त्यांच्याकडून दुष्कर्मे करविली. जन्मभर पश्चात्तापाच्या खाईत राजमातेला होरपळत राहावे लागणार. ह्या सर्वाला कारण हा नीच चंडवर्मा. असे सगळ्यांचे एकमत झाले. तेव्हा त्यांच्या भयंकर अपराधाला योग्य शासन झालेच पाहिजे असे सर्वानुमते ठरले. त्याला देहान्ताची शिक्षा फर्मावण्यात आली.

चंडवर्म्याचा कडेलोट करण्यात आल्यानंतर लगेचच राजमाता विलासिनीला राजनांदगावच्या राजवाड्यात नजरकैदेत ठेवण्यात आले.

आता शक्य तितक्या लवकर युवराज महाराजांचा राज्याभिषेक समारंभ साजरा करण्यात यावा असे सर्वांचे म्हणणे पडले. राजगुरू आणि प्रधानजी यांनी राजज्योतिषांना बोलावून आणून त्यांना राज्याभिषेकासाठी मुहूर्त काढण्यास सांगितले. शास्त्रोक्त मुहूर्त काढण्यासाठी राजज्योतिषी अभयसिंह युवराजांची कुंडली बारकाईने पुनः पुन्हा पाहत होते. त्यांनी राजगुरूंना ठामपणे सांगितले की, युवराज महाराजांच्या विवाहाचा मुहूर्त आधी आणि

नंतरच राज्याभिषेकाचा मुहूर्त लाभणार आहे.

राजगुरू आणि प्रधानजी यांनी युवराजांपाशी त्यांच्या विवाहाची गोष्ट अनेकदा काढली होती. राज्याभिषेकापूर्वी युवराज महाराजांचा विवाह-समारंभ होणे अवश्य आहे असे त्या दोघांना वाटत होते. पण युवराज महाराजांनी तिकडे दुर्लक्ष केले होते. बिजलीकडे तर युवराज महाराजांचे मन ओढ घेत नाही ना अशी शंकाही त्या दोघांच्या मनात येऊन गेली होती. परंतु विवाहाची गोष्ट बिजलीच्या गावीही नाही असे त्यांना स्पष्टपणे दिसून आले होते.

चंडवर्म्याची न्यायासनासमोर चौकशी चालू असता विचित्रसेनाची साक्ष काढण्यात आल्यापासून त्याने मानसिंहाच्या मार्फत प्रधानजी आणि युवराज महाराज यांची गाठ घेण्यासाठी खटपट चालविली होती. त्या त्याच्या खटपटीला यश येऊन त्याने आपल्याला मनापासून पश्चात्ताप होत असल्याची त्यांची खात्री पटवली होती. चंडवर्म्याने सरनोबत बनून राज्याची सूत्रे स्वतःच्या हाती घेतल्यामुळेच आपल्याला शत्रूला मिळण्याची बुद्धी झाली असे त्याने शपथपूर्वक सांगितले. तसेच त्या पाताळयंत्री चंडवर्म्याचा योग्य तो शेवट झाल्याने आता आपण युवराज महाराजांची एकनिष्ठपणे सेवा करू असे त्याने आश्वासन दिले. सूर्यसेन महाराज होते तोपर्यंत आपण किती राजनिष्ठ होतो हे त्याने पटवून दिले. तसेच सूर्यसेन महाराजांनी काढलेल्या उद्गारांची आठवण देऊन आपली कन्या महाश्वेता हिचा युवराज महाराजांबरोबर विवाह व्हावा ही आपली तीव्र इच्छा त्यांनी पुनःपुन्हा आर्जवाने बोलून दाखविली. ह्या बोलण्याचा प्रधानजींप्रमाणेच राजगुरूंवरही बराच प्रभाव पडला होता.

विजयादशमीला भरलेल्या दरबारात विचित्रसेन यांनी युवराज

महाराजांची आजपर्यंतच्या आपल्या घोर अपराधांबद्दल क्षमा मागितली. युवराज महाराजांनी त्यांना क्षमा केल्याची घोषणा केली. त्यानंतर विचित्रसेन यांनी राजनिष्ठेची शपथ घेतल्यावर त्यांना सरदारकीची वस्त्रे देण्यात आली. त्यांचा विलासपुरातील पूर्वीचा वाडा पुन्हा त्यांच्या ताब्यात देण्यात आला. लवकरच त्यांनी विशालदुर्गावरून आपली सारी माणसं लवाजम्यासह विलासपूरला आणवली. त्यांची कन्या महाश्वेता खरोखरीच नक्षत्रासारखी सुंदर होती. रूपसौन्दर्याबरोबरच परमेश्वराने तिला गुणांची संपदा दिलेली होती. युवराज महाराजांचे मन वळविण्याचे काम त्यामुळे सोपे झाले.

मार्गशीर्ष महिन्यातला पहिलाच मुहूर्त युवराज अभयसिंह महाराज आणि सरदार विचित्रसेन यांची कन्या महाश्वेता यांच्या विवाहासाठी निश्चित करण्यात आला, आणि पंधरा दिवसांनीच राज्याभिषेक समारंभाचा मुहूर्त ठरविण्यात आला. राज्याभिषेक होऊन अभयसिंह महाराज सिंहासनाधिष्ठित असे आपल्या प्रजेचे खरेखुरे पालनकर्ते केव्हा एकदा होतात असे बिजलीला झाले होते. हा राज्यारोहणाचा समारंभ आवश्यक होता म्हणूनच तिला तो व्हायला हवा होता. एरवी तिला समारंभाची हौस अशी थोडीच होती ?

विवाह-समारंभाची सर्व जबाबदारी साहजिकपणेच सरदार विचित्रसेन यांनी स्वीकारली होती आणि ते लगेच त्या दृष्टीने तयारीलाही लागले. राज्याभिषेकाची खूपच तयारी करायला हवी होती. पण त्यासाठी राजगुरू, प्रधानजी, सरसेनापती वीर-सिंह आणि सरदार मानसिंह एवढी मातब्बर माणसं होती. बिजलीला प्रश्न पडला की ह्या दीड महिन्याच्या अवधीत आपण

विलासपूरला राहून काय करणार ? त्यापेक्षा आपण शिवनीला गेलो तर आपल्या शेतकरी बांधवांबरोबर शेतात कापणीची वगैरे कामं करता येतील नि आपल्या बापाला मदत होईल, त्याला आनंद होईल. असा विचार करून ती शिवनीला जायला निघाली. बरोबर तिने भीमा आणि थोडे घोडदळातले लोक घेतले.

पावसाळा आता संपला होता. वनराईने गर्द हिरवा रंग धारण केला होता. रानकोंबड्यांचे आवाज रानभर उठू लागले होते. शिवारात पिकं सळसळू लागली होती. वाटेत लागलेले सगळे तलाव, तळी, नद्या, ओढे पाण्याने तुडुंब भरून गेले होते. वाऱ्याबरोबर त्यांच्या पृष्ठभागावर उठणाऱ्या लहरी म्हणजे जणू त्यांचं प्रसन्न हास्य वाटत होतं. अशा प्रसन्न वातावरणात प्रवास सुखद वाटत होता. बिजलीला पाहताच बजाबाला खूप आनंद झाला. पण त्याचबरोबर ती अचानक आल्यामुळं त्याला वाटलेलं आश्चर्यही त्याच्या मुखावर दिसत होतं. ‘ पिकं कापणीला आलीयत ना म्हणून तुझ्या मदतीला आले, बाबा ! आणि माझ्या दुर्गादेवीचा आशीर्वाद घ्यायचाय माझ्या अखेरच्या मोहिमेसाठी ! ’ असं म्हणत बिजली बापाच्या मिठीत विसावली.

★　★

## ९

मार्गशीर्ष शुद्ध द्वितीयेच्या गोरज मुहूर्तावर युवराज अभयसिंह महाराज यांचा विवाह सरदार विचित्रसेन यांची कन्या महाश्वेता हिच्याशी मोठ्या थाटाने साजरा झाला. विवाहसमारंभाची सारी जबाबदारी सरदार विचित्रसिंहांवर होती. त्यांनी धार्मिक बाबतीत कोणतीही उणीव राहू दिली नव्हती. चार दिवस सोहळा चालू होता. मिष्टान्नांचे भोजन, नृत्य, गायन आदी सर्व गोष्टी नावाजण्यासारख्या झाल्या. परंतु सूर्यसेन महाराजांच्या हयातीत राजघराण्याची जी शान, जे ऐश्वर्य प्रतीत होत होते ते ह्या समारंभात कसे असणार ? शिवाय राजमातेने आपल्याच कर्माने नजरकैद ओढवून घेतलेली. युवराज महाराजांच्या बाजूने त्यांचे जिवश्चकंठश्च मित्रवर्य सरदार मानसिंह आणि त्यांची पत्नी पद्मिनीदेवी यांनी सर्व सांभाळून घेतले. बिजली व बजाबा यांना निमंत्रण गेलेले होते. पण बिजलीला विवाहसमारंभात मिरविण्याची मुळीच हौस नसल्याने ती दोघे आली नव्हती. युवराजमहाराजांना बिजलीची अनुपस्थिती थोडी खटकलीच. पण तिच्या

स्वभावाची सर्वांनाच कल्पना आलेली असल्यामुळे ही गोष्ट कुणी मनावर घेतली नाही.

मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीला संध्याकाळी राज्याभिषेक विधींना प्रारंभ होणार होता. बिजली बजाबासह दशमीला सकाळीच विलासपूरला हजर झाली. तिला स्वतःला राज्याभिषेक समारंभाचेच महत्त्व वाटत होते, आणि ह्या महत्त्वाच्या प्रसंगी आपल्याबरोबर आपला बाप असावा अशी फार इच्छा होती तिची. म्हणून तिने आग्रहाने बजाबाला आपल्याबरोबर यायला लावले.

त्या दोघांचे घोडे राजरस्त्याला लागले तेव्हापासूनच बिजलीच्या नजरेला नवीन नवीन गोष्टी दिसू लागल्या. राजरस्त्यावर पाणी शिंपडलेले होते. एक नवी पेठ सजलेली दिसत होती. ओझी लादलेली घोडी, उंट दाटीवाटीने उभे होते. निरनिराळ्या राज्यांतून व्यापारी आले होते. काहींनी हत्तीही आणले होते. चित्रविचित्र वेषभूषेतले ते व्यापारी आणि त्यांच्या हाताखालची माणसे दुकानांची मांडामांड करण्याच्या धांदलीत इतस्ततः वावरत होती.

राज्यांतील प्रतिष्ठित मंडळी, मांडलिक व इतर राजे यांना निमंत्रणे गेलेली होती. येणाऱ्या पाहुण्यांच्या वास्तव्यासाठी खास शामियाने, डेरे आणि भोजनाच्या पंक्ती बसविण्यासाठी विस्तीर्ण मंडप उभारले होते. त्या त्या ठिकाणी सेवक आणि त्यांच्यावरील अधिकारी यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. सिंहासनसदरेपासून नगारखान्यापर्यंतचा विस्तीर्ण चौक आलिशान शामियान्यांनी व्यापला होता. राजसदरेपासून नगारखान्याच्या प्रवेशद्वारापर्यंत सुरुदार खांब उभारले होते. राजसदरेची इमारत भारी पडदे लावून सुशोभित केली होती. राजवाडा अतिशय

भव्य. त्यात अनेक महाल, निरनिराळी मंदिरे, गृहे आणि दिवाण-खाने होते. आधीच सर्व सुखसोयींनी सुसज्ज असलेला विलास-पूरचा विख्यात राजवाडा राज्याभिषेकसमारंभासाठी शृंगारण्यात आला होता. ह्या वैभवशाली राजवाड्यातील दक्षिणेच्या बाजूच्या खास महालात बिजली व बजाबा यांच्या राहण्याची व्यवस्था केलेली होती.

राज्याभिषेकाची सर्व तयारी जवळ जवळ पुरी होत आली होती. राजगुरू आणि प्रधानजी यांनी सर्व आखणी काटेकोरपणे केलेली होती. सर्व गोष्टींची जुळवाजुळव ते उत्साहाने करीत होते. दूर-दूरच्या ठिकाणांहून आणण्याच्या वस्तूंची जबाबदारी सेनापती वीरसिंहांनी घेतलेली होती. भारतातल्या सगळ्या पवित्र नद्यांचे व सागरांचे जल आणण्यात आले होते. स्थानिक गोष्टींची सर्व जबाबदारी सरदार मानसिंहांनी घेतलेली होती. धार्मिक विधीं-साठी लागणाऱ्या सर्व साहित्यासाठी स्वतंत्र कोठी तयार केली होती. लक्ष्मीगृह, वस्त्रागार, शस्त्रागार त्या त्या साहित्यांनी सुसज्ज झाली होती.

वस्त्रागारात गालिच्यांवर उंची तलम सुताची वस्त्रे, रेशमी वस्त्रे, जरीची वस्त्रे, धोतरे, अंगरखे, तुमानी आदी हारीने मांडून ठेवलेली होती. काही पांढरे नि काही केशरी जिरेटोप तेथे होते. त्यांच्यावर सुंदर कलाकुसर केलेली असून प्रत्येकावर मोत्यांचा तुरा डुलत होता.

लक्ष्मीगृहात तक्तपोशीला सुबक कलाकुसरीचा चांदीचा भव्य तराजू अडकविलेला होता. विविध आकारांची सोन्याची व चांदीची भांडी ओळीने लावून ठेवली होती. त्यांत नाना कुंभ, घंगाळे, गडवे, पळ्या, पंचपात्री, ताम्हने होती. पलीकडे चौरंग

आणि पाट होते. नि त्याच्याही पलीकडे रत्नजडित सोन्याची अंबारी होती. मध्यभागी सिंहासन ठेवलेले होते. सूर्यसेन महाराजांचे हे सिंहासन सोन्याने मढविलेले असून भव्य व उंच होते. ते अष्ट-कौनी असून प्रत्येक कोनावर सुवर्णसिंह बसविलेले होते. त्यांच्या डोळ्याच्या जागी माणके जडविलेली होती. प्रत्येक सिंहावर सोन्याचा खांब उभा केलेला होता. त्या आठ खांबांवर सिंहा-सनाची मेघडंबरी सावरलेली होती. सिंहासनावर सुंदर कोरीव-काम केलेले असून नवरत्ने जडविलेली होती. प्रशस्त असे सोन्याचे छत्र केलेले असून त्याला मोत्याची झालर लावलेली होती. जवळच दुर्गादेवीसाठी तयार केलेला किरीट व दागिने होते. अभयसिंह महाराजांच्या राज्यारोहणासाठी राजगुरूंनी सिंहासन सशास्त्र सिद्ध केले होते. वेदीवर नवीन सुवर्णाच्या लगडी मढवून सिंहासनाच्या पहिल्या पायरीच्या खोबणीत रत्नजडित मुठीची तलवार लटकावली होती.

राज्याभिषेक समारंभाच्या निमित्तानं शंभर हत्तींचं एक दल स्थापन करण्यात आलं होतं. अभयसिंह महाराजांसाठी एक उंचापुरा धिप्पाड हत्ती निवडण्यात आला होता. अंबारीचा हा ऐरावत जातिवंत आणि सुलक्षणी होता. ह्या हत्तींसाठी एक प्रचंड तलाव तयार करण्यात आला होता. ह्या तलावाभोवती हत्तींची जलक्रीडा पाहण्यासाठी रोज दुपारी लोकांची गर्दी जमत होती. गजशाळेमुळं विलासपूरला एक नवीन वैभव लाभलं होतं.

मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीचा दिवस पूर्व क्षितिजावर सोन्याचा मंगलकलश घेऊन उगवला. सनई, चौघडा आदी मंगलवाद्ये नगार-खान्यात वाजू लागली. ऐंद्रीशांतीसाठी होम सुरू झाला. त्यानंतर तुलादान विधीला सुरुवात झाली. चांदीचा तराजू टांगलेला होता.

राजगुरूंच्या सांगण्याप्रमाणे अभयसिंह महाराज जमिनीवर टेकलेल्या पारड्यात बसले. अनेकजणांनी धरलेल्या दुसऱ्या पारड्यात सुवर्णमुद्रा टाकण्यास सुरुवात झाली. पंधरा हजार सुवर्णमुद्रांबरोबर अभयसिंह महाराजांची तुला झाली. त्या आनंदाप्रीत्यर्थ चौघडे झडले, शिंगे आणि तुताऱ्या फुंकल्या गेल्या. त्यानंतर चांदी, तांबे, पितळ आदी धातूंबरोबर आणि नंतर व्यवहारोपयोगी वस्तू व नाना खाद्यपदार्थांबरोबर महाराजांची तुला करण्यात आली. तुला झालेले सोने, चांदी वगैरे सर्व गोष्टी महाराजांनी स्वतःच्या हातांनी दान केल्या. सर्वजण संतुष्ट झाले.

चतुर्दशीचा सूर्य मावळण्यापूर्वी व चंद्रोदय होत असताना राज्याभिषेक विधीला आरंभ झाला. प्रथम महाराजांनी श्रीगणेशपूजन केले. नंतर स्वस्तिवाचन झाले. त्यानंतर श्रीनारायणपूजन, दुर्गापूजन झाल्यानंतर आज्यहोम करण्यात आला.

त्यानंतर महाश्वेता राणीसह अभयसिंह महाराजांनी मंडपपूजा केली. ह्यावेळी राणीसाहेब तांबडालाल शालू नेसल्या होत्या. कमरेला सोन्याचा कमरबंद चकाकत होता. गळ्यात व कानांत हिऱ्यामोत्यांचे दागिने शोभत होते. त्यांच्या कपाळी सुवर्णरौप्यमुकेशाने मळवट भरला होता.

महावेदीसमोर प्रत्येक दिशेला चार चार कुंभ स्थापन केलेले होते. पूर्वेला सोन्याचे कुंभ असून त्यांत मध भरलेला होता. दक्षिणेला चांदीचे कुंभ असून त्यांत महानद्यांचे जल भरले होते. पश्चिमेला तांब्याचे कुंभ असून त्यांतही पवित्र जल होते. उत्तरेच्या मातीच्या कुंभांत दूध, दही व तूप भरलेले होते. सगळे कुंभ वस्त्रांनी वेढलेले असून लतापुष्पांनी सुशोभित केले होते. अभिषेकासाठी औदुंबरशाखांची आसंदी केलेली असून ती रुप्याने मढवि-

लेली होती. तिची सशास्त्र स्थापना झाल्यावर सागरांच्या व नद्यांच्या जलाचे कुंभ आणि गंध, पुष्प, फल व रत्ने यांनी भरलेले कुंभ वेदीजवळ ओळीने ठेवण्यात आले. महावेदीवर अग्नीची व ग्रहांची प्रतिष्ठापना झाली. अनेक मृत्तिकांची व कुंभांची विधि-पूर्वक प्रतिष्ठापना करून सर्वप्रधान होम केला. ह्या होमाच्या वेळी वेदमंत्रघोषांनी सारे वातावरण धुंदावून गेले.

त्यानंतर महाराजांचे समंत्रक स्नान झाले. त्यांनी शुभ्र वस्त्रे परिधान केली. आणि ते पुन्हा वेदीवर आले. तेथे त्यांना मंत्र-घोषात निरनिराळ्या मृत्तिका लावण्यात आल्या व पंचामृत-स्नान घालण्यात आले. नंतर वेदमंत्रांच्या घोषात अभयसिंह महाराज मंडपात गेले. तेथे समंत्रक प्रतिष्ठित केलेल्या आसंदीवर गुडघे लववून महाराजांनी आरोहण केले. पाठोपाठ महाश्वेता महाराणी आल्या आणि महाराजांच्या शेजारी बसल्या. महा-राजांच्या पूर्वेला प्रधानजी तुपाचा सुवर्णकलश घेऊन उभे राहिले. दक्षिणेला सरसेनापती वीरसिंह दुधाचा कलश घेऊन उभे राहिले. पश्चिमेला दह्याचा कलश घेऊन सरदार विचित्रसेन आणि उत्तरेला मधाचा कलश हाती धरून सरदार मानसिंह उभे ठाकले पंखे, मोर्चेले घेऊन दुसरे प्रमुख सरदार अष्टदिशांना उभे होते.

राजगुरूंनी नारायणभट्टांच्या हस्ते अभिषेकाला सुरुवात केली. महापंडित मंत्रघोष करू लागले. भारतातील महानद्यांची उदके, सागरांचे जल महाराजांचे अंग पवित्र करू लागली. अभिषेकाच्या वेळी चालू असलेला तो गंभीर मंत्रघोष ऐकणाराच्या अंगावर रोमांच उभा करीत होता. अभिषेक संपल्यावर सुवासिनींनी महाराजांना आणि महाराणींना ओवाळले. तुपाने भरलेल्या काशाच्या पात्रात महाराजांनी आपले मुखावलोकन केले. नंतर

वस्त्रे बदलून त्यांनी उंची पोषाख व बहुमोल अलंकार धारण केले. त्यानंतर शस्त्रपूजा करून महाराजांनी ढालतलवार व धनुष्यबाण यांचा स्वीकार केला. नंतर महाराज आणि महाराणी यांनी जोडप्याने कुलदेवतेला आणि दुर्गादेवीला नमस्कार केला आणि मग राजगुरू आणि प्रमुख आचार्य यांना वंदन केले.

महाराज अभयसिंहजी सिंहासनारोहणासाठी राजसभेकडे निघाले. सरदारांनी, मानकऱ्यांनी व विद्वान ब्राह्मणांनी राजसभा शोभत होती. राजसदरेसमोरच्या विस्तीर्ण चौकात गालिचे अंथरले होते. नगारखान्याच्या द्वाराशी दोन मोठे हत्ती आणि दोन पांढरे शुभ्र घोडे उभे होते. चौकातल्या मांडवावर नाना रंगांच्या भारी कापडांच्या कनाती उठून दिसत होत्या. राजसदरेवर मध्यभागी उंच चौथरा उभारला होता. भरजरी गालिच्यांनी तो चौथरा आच्छादला होता आणि त्यावर सिंहासन मांडले होते. राजसदरेची व्यवस्था अशी केली होती की, कुठल्याही कोपऱ्यातून सिंहासन नजरेला यावे.

ब्राह्ममुहूर्तावर महाराज राज्यसभेत आले. सोन्याचे गुर्झब घेतलेले गुर्झबदार सामोरे चालत होते. मखमली पायघड्या घातलेल्या पायऱ्या चढून महाराज राजसदरेच्या पहिल्या टप्प्यावर आले. नंतर उजव्या बाजूच्या पायऱ्या चढून ते पहिल्या चौथऱ्यावर आले. सगळ्यांच्या नजरा महाराजांकडे वळल्या. सिंहासनामागे भालकरी उभे होते. त्यांच्या हातांतील सोन्याच्या भाल्यांवर अधिकारदर्शक व राजसत्ता निदर्शक चिन्हे होती. बाजूला एका मौल्यवान भाल्याच्या टोकावर समपातळीत लोंबकळणारी सोन्याच्या तराजूची पारडी न्यायचिन्ह म्हणून तळपत होती.

महाराजांचे लक्ष डाव्या सदरेवर जरीच्या बैठकीवर श्वेत वस्त्रे परिधान करून बसलेल्या बिजलीवर काही क्षण स्थिरावले. त्यांचा ऊर भरून आला, आणि एवढ्यात राजगुरूंनी वेदमंत्र म्हणावयास सुरुवात केली. साऱ्या पंडितांनी तो वेदघोष उचलला.

संथ पावले टाकीत अभयसिंह महाराज सिंहासनाचा चौथरा चढले आणि काही क्षण तेथेच उभे राहिले. वेदातील मंत्रघोषांचा गंभीर नाद राजसभेत भरून राहिला होता. सिंहाचा मुखवटा असलेला सुवर्ण राजदंड राजगुरूंनी महाराजांच्या हाती दिला. तो राजदंड मस्तकी लावून महाराजांनी सिंहासनाकडे पाहिले आणि अत्यंत नम्रभावाने सिंहासनारोहण केले. महाराज वीरासन घालून बसले. त्यांच्या मस्तकावर मुकुट शोभत होता. साऱ्यांची नजर महाराजांवर खिळली होती.

मंत्रघोष चालू असतानाच राजगुरूंनी मौल्यवान छत्र उचलले आणि महाराजांच्या मस्तकावर धरले. मंत्रघोष संपला आणि जय घोषणा घुमू लागल्या. तो सोहळा पाहत असलेल्या हजारो मुखांतून महाराजांचा जयजयकार होत होता. मृदंगावर थाप पडली. नर्तकींचे पदन्यास बोलू लागले. गवयांचे गायन सुरू झाले. वाद्यांच्या मेळांनी, सप्तसुरांनी वातावरण नादमय केले. राष्ट्रभूमीला सिंहासेनाभिषिक्त छत्रपती महाराज लाभल्याची वार्ता आसमंतात पसरली. सिंहासनावर जेव्हा महाराजांना सुवर्णस्नान घातले जात होते त्याच वेळी पूर्वेला सूर्योदय होऊन हेमकुंभ वर येत होता. सुवर्णस्नान आटोपल्यावर सिंहासनाच्या खाली असलेल्या जोत्यावर राजगुरू, प्रधानजी आणि मानसिंह बसले. सारा दरबार खडा होता. मानाप्रमाणे सरदार मह... अर्पण करीत होते. महाराज नजराण्यांचा स्वीका... राख

BVBK-0400243
BVBK-0400243

देववीत होते.

माध्यान्हीला अभयसिंह महाराज महाराणी महाश्वेतादेवींसह देवदर्शन करणार होते. चौकात सारा लवाजमा तयार होता. महाराजांचा ऐरावत पाठीवर सुवर्ण अंबारी घेऊन झुलत उभा होता. सोन्यारुप्याच्या अलंकारांनी आणि भरजरी खोळीने त्याला सजविण्यात आले होते. सरसेनापती वीरसिंहजी माहूत बनले होते. महाराज आणि महाराणी अंबारीत बसली. प्रधानजी सोन्याच्या मुठीचे मोर्चेले त्यांच्यावर ढाळू लागले. मिरवणूक निघताच असंख्य तुताऱ्यांचा नाद उठला. महाराजांच्या जयघोषात मिरवणूक पुढे सरकू लागली. मिरवणुकीत अग्रभागी घोडदळ होते. आपल्या पांढऱ्याशुभ्र देखण्या गुलछडीवर स्वार झालेली बिजली लक्ष वेधून घेत होती. मिरवणूक पेठेत आली तेव्हा महाराजांवर फुले आणि मोहरा यांची वृष्टी होऊ लागली. दुतर्फा वाड्यांच्या, घरांच्या माड्या लोकांनी-- विशेषत: स्त्रिया व मुले यांनी—भरून गेल्या होत्या. महाराज दिसताच हात जोडले जात होते.

देवदर्शन होऊन मिरवणूक परत येताच राजसदरेच्या मंडपातून गाण्यांचे सूर उठले आणि राज्याभिषेकानिमित्त उत्सव सुरू झाला. महाराजांच्या विवाहसमारंभाच्या वेळीच आलेले गवय्ये, वादक, नर्तक, कलावंतिणी राज्यभिषेक समारंभासाठी विलासपुरात मुक्काम करूनच होते. नृत्यगायनाच्या नादात सारे विलासपूर धुंदावून गेले.

पौर्णिमेचा पूर्ण चंद्र आकाशात आता बराच वर चढला होता. महाराजांनी रात्रीचा दरबार भरविला होता. राजसदरेच्या

बैठकीवर लोड.तक्क्याच्या भारी बैठकी सजविल्या होत्या. सहस्र ज्योतींनी तेजाळलेल्या वृक्षदीपांनी सारी सदर झगमगत होती. भव्य समयांच्या उजेडात रत्नखचित सिंहासन चमकत होते. सारे सरदार, मानकरी आपापल्या जागी मानाप्रमाणे बसले होते.

महाराज सिंहासनावर बसताच गुर्झबदाराने सुवर्णदंडाचा दोनदा आवाज केला. झुकलेल्या नजरा वर झाल्या. महाराजांनी सर्वांना बसण्याची खूण केली. सारा दरबार स्थानापन्न झाला. महाराज दरबारावरून आपली नजर फिरवीत होते. सुशोभित बैठकीवर बिजली बसली होती. तेजस्वी मुद्रा, पांढराशुभ्र पोषाख यामुळे बिजली दरबारचं जणू भूषण अशी शोभत होती. तिच्याकडे एकटक पाहून महाराज बोलू लागले,

‘ आम्ही छत्रपती सिंहासनाधीश्वर झालो खरे. पण ह्या छत्राचा भार आणि सिंहासनाची शान सावरणारी दुर्गादेवीची दूती बिजली ही आहे. आमच्या सेनादलाचे सर्वाधिकारित्व समर्थपणे करणाऱ्या ह्या अलौकिक रत्नाचा गौरव करण्यासाठी आम्ही हा खास दरबार भरविला आहे.’

बिजलीला हे सर्व अनपेक्षित असल्याने तिने अतिशय संकोचाने हा दरबारी सन्मान स्वीकारला.

★ ★